म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक स्वदेशहितेच्छु

सन १८८[illegible]

ग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव ब्राम्हणवर्णाचे मूळ

८

सां. क्र.

# ब्राम्हणवर्णाचें मूळ.

## निबंध

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ७२
सन १८६४

MAJOR THOMAS CANDY,

The Maráthí Translator in the Educational

Department,

The President of the Daxina Prize Committee,

and Lately,

The First Principal of the Poona College,

This small work is dedicated,

as a token of respect, affection and gratitude,

By

His obedient and dutiful scholar,

THE AUTHOR.

लेखक

एक स्वदेशहितेच्छु

शके. १८८४

19·150

# ब्राह्मणवर्णाचें मूळ.

( ता० २१ आगष्ट १८६३ रोजीं पश्चिम हिंदुस्थानांतील "युनैतेद सर्विस इन्स्तित्यूशन" या सभेपुढें दाक्तर मार्तिन हाग साहेब यांनीं दिलेलें व्याख्यान. )

जो ब्राह्मणधर्माचा अधिकार विशेष महत्वाच्या कांहीं एका मर्यादित संख्येच्या लोकांनीं हिंदुस्थानांतील कोट्यावधि लोकांवर हजारोंवर्षें चालविला आणि जो आज दिवसपर्यंत एकसारखा चालू आहे त्याचें, ह्मणजे ब्राह्मण्याचें मूळ या अखंडदंडायमान कालाच्या अगाधदरीमध्यें राहिल्यामुळें तें लोकांत अगदीं लुप्त होऊन गेलें आहे. इतिहासांत अथवा दुसऱ्या कोणत्याही लेखांत, ब्राह्मणवर्ण हा अगदीं स्वतंत्र असा कधीं स्थापित झाला आणि या वर्णाचें वर्चस्व धर्मप्रकरणांत कधीं स्थापित झालें, याविषयीं आधारपर लेख कोठें ही आढळत नाहीं. ब्राह्मण स्वतः असें ह्मणतात कीं, आमचें व आमच्या धर्माचें उत्पत्तिस्थान ईश्वरच होय— ह्मणजे परमेश्वररूप जें ब्रह्म त्याच्या प्रत्यक्ष मुखापासूनच आमची उत्पत्ति झाली आहे; आणि मनुष्यमात्रास ज्ञान देण्यासाठीं व कैवल्याचा मार्ग दाखविण्यासाठीं ईश्वरानें आमची योजना केली आहे. या वाक्यांत "मनुष्यमात्र" या शब्दाचा अर्थ फारच मर्यादित, ह्मणजे हिंदुधर्मांतले जितके लोक तितकेच, असा समजला पाहिजे. जे यांतले नसत अथवा ज्यांत ईश्वरस्थापित जातिनिर्बंध नसत

तसल्या सर्व लोकांस ते अतिनीच प्राणी असें मानीत असत; म्हणजे त्यांची गणना हिंदुधर्मवर्तिपुण्यमानव आणि पशु या दोहोंच्या मध्यें करीत असत. याकरितां ब्राह्मण हे हिंदुलोकांतर्गत लोकांस मात्र स्वर्गमार्ग दाखवणारे होत; परदेशस्थ लोक ज्यांस ते सामान्यतः "म्लेंच्छ" म्हणतात, त्यांस तो दाखवणारे नव्हेत.

सर्व जातींमध्यें आमचें विशेष वर्चस्व ईश्वरानेंच स्थापित केलें आहे असें सिद्ध करण्याकरितां अनादि आणि अपौरुष असे मानलेले जे **वेद** त्यांतील कांहीं आधार ब्राह्मण लोक दाखवतात. वेद हे अत्यंत पुरातन काळचे लेख आहेत. प्रस्तुत काळच्या विभागाप्रमाणें ऋक्, यजुष्, साम आणि अथर्वण असे चार वेद आहेत. प्रत्येकाचे मुख्य दोन भाग आहेत. प्रथम भाग संहिता होत. त्यांत मंत्र आहेत. त्या मंत्रांच्या अंगीं अद्भुत सामर्थ्य आहे असें मानिलें आहे. द्वितीय भाग ब्राह्मणें होत. यांत मोठमोठ्या ब्रह्मवेत्त्यांनीं याज्ञिक व संस्कार प्रकरणांवर विचार केले आहेत. मंत्रांची कर्मांकडे योजना केली आहे आणि किती एक यज्ञ कर्मांचें मूळ व त्यांचा गूढ अर्थ यांचें स्पष्टीकरण केलें आहे.

ऋक्, यजुष् आणि साम यां तीनही वेदांत पुरुषसूक्त म्हणून एक लहानशी प्रार्थना आहे. तींत जातींचें मूळ सांगितलें आहे. सर्व वर्णांत आम्हास श्रेष्ठत्व आहे असें तुम्हीं म्हणतां, हें कोणत्या आधारावरून म्हणतां, असा प्रश्न ब्राह्मण-

लोकांस केला असतां ते नेहमीं या सूक्ताचें प्रमाण दाखवतात. या सूक्ताची मान्यता व महत्व इतकें आहे कीं धर्मनिष्ठ ब्राह्मण म्हटला म्हणजे त्यानें प्रत्यहीं स्नान केल्या नंतर हें सूक्त एकवार म्हटलेंच पाहिजे. या सूक्ताचा अर्थ दुर्बोध आणि दृष्टांतपर अथवा रूपकपर आहे. देवांनीं **पुरुषाचा** बलि कसा दिला, आणि या बलिदानाच्या योगानें सर्व श्रुति, महाभूतें, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण, आणि सर्व जनावरें हीं कशीं झालीं याविषयीं यासूक्तांत प्रतिपादन केलें आहे. "पुरुष" याचा अर्थ मनुष्य व आत्मा, आणि परमेश्वर. यांतला परमेश्वर हा अर्थ मागून कल्पनेनें काढलेला आहे. मूळ अर्थ मनुष्य असा असल्यामुळें त्यापासून परमेश्वर हा अर्थ करण्यास अडचण पडली नाहीं. कारण, वेदांच्या उत्पत्तिकालापासून आजपावेतों हिंदुलोकांच्या संपूर्ण ग्रंथांत जिकडे तिकडे असें मत आहे कीं, मनुष्य हा ब्रह्मस्वरूपाचा परमाणुरूप एक अंश होय, आणि तत्वदृष्ट्या पाहतां त्यापासून कोणत्याही अंशीं निराळा नाहीं.

या सूक्तांतील पुरुष शब्दाचा अर्थ या सर्व चराचर विश्वाचा आत्मा असा आहे. सर्व व्यापक अशा पुरुषाचा बलि दिल्या पासून हें जगत् उत्पन्न झालें, ही कल्पना केवळ ब्राह्मण लोकांत आढळते असें नाहीं; पारशी लोकांतही अशीच कल्पना आढळते. ते असें मानतात कीं, **गोशुरून** म्हणून एक सर्व व्यापक वृषभ होता, तो **अन्हिमन** नांवाच्या

सैतानानें मारला, त्याच्या देहापासून सर्व जीवांची उत्पत्ति झाली. पुरातन काळचे **स्कांदिनेवियन** लोक असें मानीत असत कीं, हें जग **वोर** याच्या पुत्रांनीं **यूमीर** नांवाचा राक्षस मारून त्याच्या देहाचे विभाग करून त्यांपासून उत्पन्न केलें.

ब्राह्मण्याच्या मूळाचा शोध लागण्या करितां वर सांगितलेल्या पुरुषसूक्तांतील अकरावी आणि बारावी या दोन ऋचांच्या अर्थाचें विवरण केलें पाहिजे. या साटीं त्या दोहांचें भाषांतर खालीं लिहितां:—

११ या पुरुषा पासून ( विश्व ) निर्माण केलें तेव्हां याचे विभाग ( देवांनीं ) किती केले? त्याच्या मुखाचें नांव काय, त्याचे दोन हात कोणते, दोन मांड्या कोणत्या, व दोन पाय कोणते?"

"१२ ब्राह्मण हें त्याचें मुख होतें; क्षत्रिय हे त्याचे हात केले होते; त्याच्या दोन मांड्या वैश्य ( कृषि कर्म करणारे ) हे झाले; आणि त्याच्या पायां पासून शूद्र हे उत्पन्न झाले."

ब्राह्मणादिक वर्णांच्या मूलाविषयीं फार प्राचीन आणि प्रमाण भूत अशीं हींच वाक्यें आहेत. यांच्या अर्था वरून पाहतां ब्राह्मण वर्ण हा त्या पुरुषाच्या मुखापासून उत्पन्न झाला असें नाहीं; तर ब्राह्मण वर्ण हें त्याचें मुख झालें, म्हणजे ब्राह्मणास मुखाच्या स्थानीं योजिलें. या वाक्याचा अर्थ खरोखर रूपकपर आहे. त्या रूपकाचें तात्पर्य हें कीं, मुख-

हें भाषणाचें स्थान आहे आणि ब्राह्मण हे मुख—म्हणजे मुखाचा व्यापार उपदेश इत्यादि करणें, तर तो करणारे ते आहेत—म्हणजे ते मनुष्य मात्राचे उपदेशक व शिक्षक आहेत बाहु हे शक्तीचें स्थान आहे, आणि क्षत्रिय हे त्या पुरुषाचे बाहु केले आहेत याचा गर्भित अर्थ असा होतो कीं राज्य रक्षणा करितां शस्त्र धारण क्षत्रियांनीं करावें. वैश्य हे त्या पुरुषाच्या मांड्या कल्पिल्या होत्या; यांतलें तात्पर्य पोटांत घेतलेल्या अन्नाचें राहण्याचें मुख्य स्थान शरीराचे खालचे भाग होत, तसे वैश्य हे सर्व वर्णास अन्न पुरविणारे लोक होत. त्या पुरुषाच्या पायां पासून शूद्रांची उत्पत्ति सांगितली, याचा ध्वनित अर्थ असाकीं, जसे पाय हे बाकीच्या सर्व शरीराचे सेवक—म्हणजे मजबूत आधार व त्यास पाहिजे तिकडे नेणारे आहेत, तसे शूद्र हे सर्व लोकांचे सेवक— होत.

वरील सूक्तांत चार जातींचा उल्लेख स्पष्ट रीतीनें केला आहे, यांत कांहीं संशय नाहीं. जे कांहीं थोडेसे युरोपियन विद्वान लोक वेदांच्या अभ्यासांत निमग्न झाले आहेत त्या सर्वांचें मत असें आहे कीं, वेदांच्या लेखांत या सूक्ताची रचना अगदीं अर्वाचीन काळची आहे. परंतु हें सिद्ध करण्यास सबल प्रमाण नाहीं. आणखी उलटीं तें सूक्त फार प्राचीन आहे असें सिद्ध करून देण्यास प्रमाणें दाखवितां येतील. या सूक्ताची रचना अस्पष्ट अथवा गूढ आहे, हें या सूक्ताच्या आधुनिकते विषयीं मुळींच प्रमाण नव्हे. ऋग्वेद संहिता म्ह-

णून जेवढी आहे तिच्या प्रत्येक अष्टकांत असल्या प्रकारचीं रूपकालंकारयुक्त सूक्तें आढळतात. या सूक्तांचे कर्ते जे ऋषि त्यांस अशा प्रकारचे विचार करण्यास मोठा उल्हास वाटत असे. ज्या यज्ञ कर्मांत ते प्रत्यहीं निमग्न होते, त्या पासूनच असले विचार त्यांस सुचत असत. यजुर्वेदांत हें सूक्त ज्या प्रकरणांत ( नरमेध संबंधि मंत्रांत ) आढळतें त्याच्या अर्थाच्या संबंधावरून नरमेधांतच याचा उपयोग करीत असत असें दिसतें. वेदोत्पत्तीच्या कालाच्या सुमारास ब्राह्मण लोकांत नरमेध हे अगदीं साधारण प्रचारांतले होते असें निःसंशय सिद्ध करतां येतें. परंतु पुढें त्यांच्या मध्यें जे विशेष प्रतिष्ठित व विद्वान झाले त्यांनीं, प्रत्यक्ष मनुष्य मारणें ही गोष्ट लोकांच्या अंतःकरणास फारच त्रासप्रद म्हणून लवकरच बंद करून टाकिली. तरी नरमेध नामक यज्ञ पुढें बहुत काल पर्यंत चालू ठेविलाच होता. कारण त्या प्रसंगीं जें जें विधान लागतें तें यजुर्वेदांत आहे. त्यांत अंतर इतकेंच कीं, यज्ञस्तंभास दुसऱ्या जातीचे मनुष्य आणून बांधावे आणि त्यांच्या मोबदला दुसरे पशु मारून त्या मनुष्यांस सोडून द्यावें, असा संप्रदाय पडला होता.

आलीकडे असें एक मत निघालें आहे कीं वेदांच्या प्राचीन म्हणजे मूळच्या भागांत जाति निर्बंधाविषयीं मुळींच कांहीं प्रमाण नाहीं. परंतु हें प्रमाणांच्या तारतम्य भावाचा सूक्ष्म विचार न होतां निघालें आहे. जातींचा जो अगदीं

स्पष्ट रीतीचा निर्बंध तो व जातिपरत्वें करून जो धर्मकर्म विभाग तो हे जसे स्मृतींत व पुराणांत स्पष्ट रीतीनें लिहिलेले आढळतात तसे वेदांच्या प्राचीन भागांत आढळत नाहींत हें खरें आहे. तथापि वेदांच्या उत्पत्तिकाळापासून किंवहुना त्यांच्या अगोदर पासूनही जातिभेद पद्धतीची माहिती खचीतच आहे. इतकेंच कीं हल्लींच्या प्रमाणें जातिमर्यादा केवळ इतक्या अनुल्लंघनीय नव्हत्या.

पारसी लोकांचे पूर्वज जे इराणी लोक ते आणि हिंदु लोक हे पूर्वींच्या काळीं एकच लोक होते; आणि फार प्राचीन काळा पासून म्हणजे हिंदु लोक त्यांज पासून वेगळे होण्याच्या पूर्वींपासूनच त्यांच्या मध्यें लोकांचे तीन विभाग चालत आले होते या विषयीं बलवत्तर प्रमाण पारसी लोकांचा "जेंद आवेस्ता" म्हणून जो ग्रंथ आहे त्यांतच आढळतें. तें असें कीं, **जोरोस्त्रियन** म्हणजे "अहुर्मस्द" धर्माचे लोक यांजमध्यें तीन जाति होत्या; त्या अशा कीं, **अथ्रव** म्हणजे उपदेशक, **रथस्थ** म्हणजे योद्धे, **वशून्य फशुयन** म्हणजे कृषिकर्म करणारे. हा जाति विभाग वेदांतील जाति विभागा प्रमाणेंच आहे—म्हणजे **अथ्रव** हे ब्राह्मण, **रथस्थ** हे क्षत्रिय आणि **वशून्य फशुयन** हे वैश्य असे होत. त्यांत अथ्रव लोकांनीं आपली जात अगदीं निराळी केली होती या विषयीं जेंदावेस्तांतील किती एक वाक्यें प्रमाण आहेत. यांचे किती एक गुप्त विचार यांज पाशींच होते आणि ते प्रसिद्ध करूं नयेत

अशी यांस अगदीं मनाई होती. त्याकाळीं उपदेशकांच पुत्रांवाचून दुसऱ्यास उपदेशक होतां येतच नव्हतें. आणि हा सांप्रदाय पारसी लोकांत आज दिवस पर्यंत सतत चालू आहेच.

प्रस्तुत जेवढें आह्मास माहीत आहे तेवढ्याचा विचार करून पाहतां जातींचें मूळ वेदांच्या रचनेच्या पूर्वींच्या काळचें च आहे. परंतु हल्लीं त्या जातिनिर्बंधाला कोटबंदी करून जी मजबुदी केलेली दिसते ती मात्र वेदांतील अगदीं अर्वाचीन रचनेच्या वेळची आहे.

ब्राह्मणवर्ण हा ईश्वरस्थापित आहे असा सर्वांचा दृढ ग्रह असल्या मुळें अत्यंत प्राचीन काळच्या ग्रंथांपासून अगदीं प्रस्तुत काळच्या ग्रंथांपर्यंत ब्राह्मण जातीच्या मुळाविषयं हकीकत तर कशी ती अगदीं आढळत नाहीं. त्यापक्षीं तिचा कांहीं तरी वास्तविक वृत्तांत समजण्या करितां, प्राचीन हिंदुस्थानांत ब्राह्मण वर्णाचा दुसऱ्या वरिष्ठ वर्णाशीं संबंध व व्यवहार कोणत्या प्रकारचा होता, आणि त्यांचा स्वतांचा मूळचा धर्म व धंदा हे कोणत्या प्रकारचे होते या गोष्टींचा सूक्ष्म विचार करीत असतां ज्या कांहीं थोड्याशा गोष्टी आढळतात त्यांचा संग्रह करून त्यां पासून अनुमान काढलें पाहिजे

वेदांवरून असें समजतें कीं, ब्राह्मणाचा मूळचा वास्तविक उद्योग म्हटला म्हणजे त्यांनीं स्वतांच्या अगर दुसऱ्याच्या कल्याणाकरितां यज्ञयागादि कर्म करावें, आणि यज्ञ

यागादि कर्मांचे अर्थ, त्यांचे हेतु आणि त्यांपासून घडणारे परिणाम यांचा विचार करावा हाच होय.

आतां ब्राह्मण या शब्दाचा अर्थ काय याचा अगोदर विचार करूं. हा शब्द "ब्रह्म" शब्दा पासून निघाला हें तर स्पष्टच आहे. परंतु ब्रह्म याच शब्दाचा मूळ अर्थ काय आहे? व्याकरण दृष्टया पाहतां हा शब्द नपुंसक लिंगी आहे आणि याचा अर्थ भाव, धर्म, अथवा तत्व अशा रीतीचा आहे. परंतु ईश्वर असा अर्थ मुतरां नाहीं. ब्रह्मा, विष्णु आणि शिव हे तीन देव मुख्य आहेत आणि त्यांपैकीं ब्रह्मा हा सृष्टि कर्ता, विष्णु हा पालन कर्ता आणि शिव हा संहार कर्ता असें सामान्यतः लोकांचें म्हणणें आहे. परंतु ही त्रैमुर्ति कांहींशी अर्वाचीन आहे. आणि या त्रैमुर्तींपैकीं जो ब्रह्मा तो दुसऱ्या (अग्नि, इंद्र, वरुण इत्यादि) देवतां प्रमाणें ब्रह्म शब्द वाच्य देवताच मानलेली आहे. तेव्हां त्या ब्रह्मशब्दवाच्य देवतेस **ब्रह्मदेव** म्हणतात आणि सर्व विश्वाच्या उत्पत्तीचें जें आदिकारण त्यास **ब्रह्म** म्हणतात, असे ते दोन्ही अर्थ अगदीं निरनिराळे आहेत.

ब्रह्म शब्द वेदाच्या अत्यंत प्राचीन व अत्यंत अर्वाचीन या दोन ही भागांत आढळतो. याचा अर्थ सामान्यतः "तत्व विद्या" म्हणजे पवित्र ज्ञान असा केलेला आहे. वेदाच्या बहुत मंत्रां मध्यें या शब्दाचा हा अर्थ आहे खरा; परंतु हा त्याचा मूलार्थ अथवा अवयवार्थ नव्हे. वेदाच्या अत्यंत प्रा·

चीन मंत्रांत या शब्दाचा अर्थ "पवित्र गाणें, प्रार्थना" असा दिसतो. परंतु हा अर्थ प्रार्थना, भक्ति इत्यादिपर जीं सूक्तें त्यांत मात्र असतो. वेदांत "ब्रह्म करणें" ब्रह्मकर्ता 'अशा रीतीचे प्रयोग हमेषा आढळतात. यांत ब्रह्म याचा अर्थ एक "पवित्र द्रव्य" असा आहे आणि ब्रह्म करणें म्हणजे ब्रह्म नामक द्रव्य उत्पन्न करणें व तें यज्ञांत ठेवणें असा अर्थ होय.

ज्या धातूपासून ब्रह्म शब्द आला आहे त्याचा अर्थ पाहतां वृद्धि असा आहे आणि त्यापासून सृष्टीचा आत्मा, उत्पादकशक्ति असा बोध होतो. ब्राह्मणाच्या सर्व यज्ञयागादि क्रिया उत्पतीविषयींच आहेत, आणि यजमान म्हणजे याग करणारा याच्या मूळच्या देहा प्रमाणेंच त्यास नवीन देह उत्पन्न करण्या विषयींचे मंत्र तंत्र त्यांत भरले आहेत. तशा मंत्र तंत्रांनीं उत्पन्न झालेल्या नवीन देहानें तो स्वर्गी जाऊन देवांसहवर्तमान वास करतो. यजमानास स्वर्गीय देहाची प्राप्ति करून देण्या खेरीज त्यास पशु प्राप्ति व पुत्र प्राप्ति करून देण्याविषयीं याग आहेत. या गोष्टी मुख्यत्वें करून वेदमंत्र म्हणण्या पासूनच घडतात. तो प्रकार असा:—

चारपायांचा एक मंत्र असे. तो म्हणणारानें दर एक अर्ध्या मंत्राच्या शेवटीं विराम घ्यावा. या प्रमाणें म्हटल्यानें एका मंत्रांत दोनवेळ विराम पडे. हे दोन विराम त्या यजमानाचे दोन पाद द्योतवितात. आणि त्या मंत्राचे चार पाद हे चतुष्पाद पशु द्योतवितात. या प्रमाणें द्विपाद आणि

चतुष्पाद अशा प्राण्याचें कांहीं एका सांकेतिक रीतीनें संमेलन करण्यापासून याजक म्हणजे ऋत्विज हा यजमानास पशूच्या बीजरूपांत दाखल करतो. हीं बीजरूपें ग्रीक लोकांतला विद्वान पुरुष प्लेतो याच्या मताप्रमाणेंच हिंदुऋषींच्या मतींही अदृश्य स्थितींत आहेत. आणि तो ऋत्विज या बीजरूपाशीं एका दुर्विज्ञेय रीतीनें यजमानाचें सख्य करून देतो. या रीतीनें पशु जातीशीं सख्य करून दिलें म्हणजे गाई, शेळ्या, इत्यादि पशु चोहों कडून त्याच्या सन्निध येतात.

"ब्रह्म" अथवा उत्पादकशक्ति इचें बाह्य दर्शक चिन्ह नेहमी यज्ञामध्यें लागत असतें. कुश नामक दर्भांची मुष्टि बांधून ती दुमडून तें केलेलें असतें. त्यास वेद म्हणतात आणि वेद व ब्रह्म हे दोन्ही अपर पर्यायच आहेत. यज्ञ समाप्त होईपर्यंत हा वेद एकाऋत्विजाच्या हातून दुसऱ्या ऋत्विजाच्या हातीं आणि यजमान व यजमानपत्नी यांच्या ही हातीं जात असतो. पारसी लोकांचे उपाध्याय कांहींविधि करीत असतात, त्यांतही हेंच चिन्ह आढळतें. ते दर्भाबद्दल एका झाडाचे टाहाळे ( ते न मिळाल्यास तारा ) घेतात आणि घडवंचीवर अगर तिवईवर ठेवतात. ते या चिन्हास "बर्सम" ( जेंदमध्यें "बरेस्म") म्हणतात. आणि हा शब्द व ब्रह्म शब्द हे मूळचे एकच आहेत.

यज्ञामध्यें मुख्य गोष्टही आहे कीं, त्यांत आवश्यक जे अनेक प्रकारचे विधि व तंत्रें तीं अशा उत्तम रीतीनें करण्या वि-

षयीं जपलें पाहिजे कीं, त्यांत कोठें कोणत्याही अंशीं अणुमात्र व्यंग न घडेल.—म्हणजे हे निरनिराळे विधि व तंत्रें जसे कांहीं दुवेच आहेत; तर ह्या दुव्यांतील एकही दुवा न बिघडतां त्या सर्वांची मिळून जशी काय यज्ञरूप एकसारखी सांकळीच होईल; अथवा वेताच्या लांबी रुंदीचे अवयव ज्या ठिकाणचे त्या ठिकाणीं योजले जाऊन, त्या सर्वांपासून जसें काय एक उत्तम प्रकारचें शरीरच निर्माण होईल. मंत्र म्हणण्यामध्यें, सामगायनामध्यें अथवा पुरोडाश तयार करण्या मध्यें जर एखादी चूक पडली तर तो यज्ञ अगदीं अप्रयोजक व व्यर्थ होतो. आणि असें झालें असतां यजमानाचें आयुष्य देखील नष्ट होण्याची भीति असते. वर्षानवर्ष सतत चालणारे आणि अत्यंत गहन व दुर्विज्ञेय अशा संस्कारांनीं व विधींनीं व्याप्त असले मोठमोठे क्रतु बिनचूक शेवटास नेणें अगदींच असंभाव्य असल्यामुळें, त्यांत घडणाऱ्या चुका दुरुस्त करण्या करितां व त्या चुकांपासून खचीत घडणाऱ्या अनिष्ट परिणामाचें निवारण करण्या करितां, प्रायश्चित्तें अवश्य पाहिजेत तीं वेदांत सांगितलीं आहेत.

सर्व यज्ञकर्मांत चूक कोठें पडते, किंवा व्यंग कोठें घडतें वगैरे गोष्टी पाहण्या विषयीं त्याजवर पूर्ण लक्ष्य राखण्याचें जें मोठें महत्वाचें काम, तें ज्या मनुष्यावर (*ऋत्विजावर) सोंपवलें असतें, त्यास अत्यंत प्राचीन काळापासून **ब्रह्मा** असें

---

* यज्ञामध्यें यजमान व त्याचीपत्नी यां खेरीज जेवढे कर्मकरणारे मनुष्य असतात त्यांस ऋत्विज म्हणतात. म. हि.

नांव दिलेलें आहे. कारण त्यास "ब्रह्म" म्हणजे सार्थ वेद फार चांगले अवगत असतात. त्यामुळें त्याचा संबंध, सर्व यज्ञ यागादि कर्माचें आदिकारण व सर्व वृद्धीचें कारण जो या विश्वाचा आत्मा, त्याशीं अगदीं निकट असतो. या ऋत्विजाची योग्यता अशी असली पाहिजे कीं, त्या एकट्यास तीन्ही वेद येत असले पाहिजेत, आणि दुसऱ्या सर्व ऋत्विजांस (सोमयागास एकंदर सोळा ऋत्विज लागतात) एकएक वेद येत असला म्हणजे झालें. ज्या तीन वेदांचें ज्ञान ब्रह्मानामक ऋत्विजास असलें पाहिजे ते **ऋक्, यजुष्** आणि **साम** हे होत.

ऋग्वेदांतील मंत्र व सूक्तें म्हणणाऱ्या ऋत्विजांस "होत्री" हें नांव दिलेलें आहे. या मंत्रांचा प्रभाव अतिशय विलक्षण आहे, असें सर्वांनीं गृहीत आहे. या गणांतील मुख्य ऋत्विज जो होता, तो देवांचा पुरोहित, म्हणजे उपाध्याय जो अग्नि त्याचा अवतार अथवा वाग्देवीचा अवतार असतो असें मानलेलें आहे. वाणीच्या अंगीं विलक्षण सामर्थ्य मानिलें आहे. पवित्र शब्दाच्या ( वेदाच्या ) योगानें होत्याच्या हातीं, यजमानाचें आयुष्य पूर्णावधि परिमित म्हणजे शतवर्षात्मक करणें, अथवा न्यून करणें हें देखील आहे. पवित्र शब्द ( वेद ) हें अशा प्रकारचें शस्त्र मानलेलें आहे कीं, त्याच्या प्रभावानें यजमानाचें सर्व पातक छिन्न होतें इतकेंच नाहीं तर त्याचे सर्व शत्रूही नाशाप्रत पावतात.

यजुर्वेदांत मुख्यत्वें करून पवित्र विधिवाक्यें आहेत. तीं

बहुत करून गद्यरूप आहेत. तीं अध्वर्यु ( यज्ञांतील सैपाकी ) प्रमुख जे ऋत्विज असतात त्यांनीं म्हणावयाचीं. अध्वर्यूचें मुख्य कृत्य हें कीं, त्यानें देवांचें भक्ष्य, पेय तयार करावें आणि त्यांच्या आहुती अग्नींत टाकाव्या. याखेरीज यज्ञीय द्रव्याची तजवीज ठेवणें, यज्ञ पात्रांची जेथल्या तेथें व्यवस्था करणें वगैरे, कामें त्याचींच आहेत. अध्वर्यु म्हणजे होत्याच्या हाताखालचा सेवक असल्या प्रमाणें आहे.

सामवेदांत, मुख्यत्वें करून गायनाच्या उपयोगी ज्या ऋचा ऋग्वेदांत आहेत, त्याच आहेत. सामगायन करणारे ( ऋत्विज सामान्यतः तीन असतात. ) हे यज्ञांतील पवित्र गायक होत. हीं सामें ज्यामध्यें बसून यजमान स्वर्गास जाणार अशा रथाच्या अथवा नौकेच्या स्थानापन्न होत. यजमान स्वर्गास जाण्या करितां व मरणानंतर त्यास स्वर्गांत स्थान मिळण्या करितां जे याग आहेत त्यांतच सामगायन करणाऱ्या ऋत्विजांची गरज लागते यांतलें कारण हेंच आहे.

या सर्व ऋत्विजां पैकीं एखाद्यानें कांहीं चूक केली असतां तिजपासून होणारे अनिष्ट परिणाम, सूत्रांत सांगितलेल्या प्रायश्चित्तार्थ अवदानें घालून, दूरकरणें हें काम ब्रह्मा म्हणून जो ऋत्विज असतो त्याचें आहे.

तीन वेदांत व श्रौतानुष्ठानांत अत्यंत निष्णात असल्यामुळें ब्रह्मत्वाच्या प्रयोगास जे मनुष्य योग्य असत तेच सर्व ऋत्विज मंडळांत वरिष्ठ असत. कारण, यज्ञाचें समग्र अनुष्ठान, तज्जन्य फळें वगैरे तेच एक जाणीत असत. ब्रह्मत्वाचा

प्रयोग मिळण्यास, तो प्रयोग पूर्वीं असणाऱ्याच्या वंशांत उत्पन्न झालें पाहिजे असें नव्हतें; तर अभ्यास, हुशारी, बुद्धिमत्ता व विद्वत्ता या गुणांच्या योगानें पाहिजे त्या ऋत्विजास तो प्रयोग मिळत असे. हा ब्रह्मत्वाचा प्रयोग करणाऱ्या ऋत्विजाचे जे वंशज तेच ब्राह्मण होत असत. दैविक गोष्टी आणि त्यांतही विशेषतः श्रौतकर्म संबंधीं गोष्टी, श्रौतकर्माचें मूळ, त्याचा अर्थ, त्याचा हेतु, श्रौतकर्माचें यथार्थ अनुष्ठान इत्यादि विषयांवर, अत्यंत प्रसिद्ध व ऋत्विक्श्रेष्ठ अशा ब्रह्मत्वप्रयोग करणाऱ्या पुरुषांनीं अथवा वेदविद्येच्या प्राचीन उपदेष्ट्यांनीं केलेले जे विचार, त्यांचा पुढें एकत्र संग्रह करून त्याचे व्यवस्थेनें निरनिराळे भाग केले; त्यांसच हल्लीं लोकांत ब्राह्मण ग्रंथ म्हणतात. आणि हे ब्राह्मण प्रत्येक वेदाचा दुसरा भाग होय.

आतां असा एक विचार उत्पन्न होतो कीं, ब्रह्मत्व करणाऱ्या ऋत्विजांची एवढी विशेष योग्यता वाढली ही कोणत्या काळीं वाढली हें समजण्या विषयीं कांहीं आधार अढळतो अगर नाहीं? कांहीं एक काळ असा अढळतो कीं, तेव्हां यज्ञामध्यें ब्रह्मा नामक ऋत्विजाचा प्रयाग मुळींच नव्हता. तो काळ कोणता म्हणाल तर ज्या काळीं हिंदु लोकांचे आणि पारशी लोकांचे पूर्वज हे एकच लोक असून, धर्म संबंधीं मतभेदामुळें परस्परां पासून विभक्त झाले तो काळ होय. पारशी लोकांच्या उपाध्यायांनीं अत्यंत पुरातन काळचे कांहीं अल्पस्वल्प यज्ञ यागादि विधि आपणांमध्यें अद्यापवि राखले आ

हेत. त्यांचें आणि ब्राह्मण लोकांतील यज्ञयागादि विधीचें अ-
तिशय साम्य आहे असें, पारशी उपाध्याय व ब्राह्मण उपाध्या-
य हे त्या त्या विधीचें अनुष्ठान कसकसें चालवितात, या विषयीं
आलीकडे मी फार सूक्ष्म रीतीनें शोध केला त्यापासून खची-
त समजलें आहे. पारशी लोकांत "होम" नांवाचा (ब्रा-
ह्मण लोकांत "सोम" नांवाचा) एक याग आहे, तो करण्या-
स "जोता" आणि "रास्पी" म्हणजे "राध्वी" हे दोनच
ऋत्विज लागतात. जोता आणि राध्वी म्हणजे ब्राह्मणांचे हो-
ता आणि अध्वर्यु हेच होत हें स्पष्ट आहे. हे दोन ऋत्विज
मोठे अगत्याचे होते, आणि आर्य लोकांत अत्यंत पुरातन का-
ळींच जे याग होत असत त्यांतही हे प्रायः लागत असत.

जों पावेतों श्रौतकर्माचीं अनुष्ठानें विशेष सोपीं होतीं आ-
णि वेद मंत्र अगदीं थोडे होते, तों पावेतों यज्ञ कर्मावर देखरे-
ख करण्या करितां ब्रह्मा नांवाच्या ऋत्विजाची मुळींच गरज
नव्हती. परंतु तीं उत्तरोत्तर अशीं घोटाळ्याचीं व कठिण
झालीं, आणि जे सोपे सोपे संस्कार होते त्यांस अनेक शाखा
फुटून तीं अशीं विस्तीर्ण जाळीं झालीं कीं, यज्ञाचें अनुष्ठान
बिनचूक तडीस नेणें, म्हणजे फारच बिकट कृत्य झालें. वे-
दार्थांत व तत्वविचारांत पारंगत असे पुरुष, यज्ञ कर्माच्या अ-
नुष्ठानांत व्यवस्था करण्यां करितां, तें सुरळीत पणं चालवण्या-
करितां आणि तें निर्दोष शेवटास नेण्या करितां असणें अवश्य
झालें. अशा काळीं ब्रह्मत्वाचा प्रयोग चालविणाऱ्या ऋत्वि-
जांचे पुत्र यांस त्यांच्या पित्यांनीं तो प्रयोग करण्यास अत्यंत

महत्वाचें जें ज्ञान तें करून दिल्या मुळें, तेच ब्रह्मत्वाच्या प्रयोगास योग्य होऊन, पुढें मोठे मान्य झाले; आणि त्यांनीं आपला एक अगदीं भिन्न असा नवीन वर्ण स्थापिला.

आज्य, पय आणि मांस यांचें हवन करण्याच्या ज्या सोत्या अनुष्ठानांस प्रहर साहा घटका लागावयाच्या, तीं अनुष्ठानें अशीं प्रचंड वाढलीं कीं, तीं हमेषा एक सारखीं वर्षानवर्ष चालू राहावीं. तर त्यांची अशा प्रकारची विलक्षण वृद्धि होण्यास व त्यांची हल्लीं दृष्टीस पडते तशी उत्तम सुधारणा होण्यास शेकडों वर्षे देखील पुरलीं नसतील, तर या गोष्टींस खरोखर हजारों वर्षें लागलीं असतील. हिंदुस्थानांत कांहीं एका काळीं ब्राह्मणाचे समाजाचे समाज यज्ञ यागांत आपलीं सर्व आयुष्यें घालवीत असत, असें वेदांतील अर्वाचीन लेखापासून व महाभारतापासून समजतें. त्या यज्ञ यागास राजे रजवाडे भरपूर मदत देत असत; कारण, यज्ञ यागादिकांपासून जे अनेकविध पदार्थ प्राप्त होतात असें मानित आहे, त्यांतच पर्जन्यवृष्टिही आहे.—म्हणजे त्यापासून पर्जन्यवृष्टि होऊन सर्व प्रजेस सौख्य प्राप्त होतें. हीं यज्ञयागादिक सत्रें यमुना व भागीरथी या नद्यांच्या वायव्येस सरस्वती नांवाची एक लहानशी नदी आहे, तिच्या तिरीं होत असत. या नदीचें नांव वेदांत वारंवार आढळतें. ब्राह्मण वर्णाच्या मूळाचा शोध लागण्या करितां आम्हास याच भागांत फार चौकशी केली पाहिजे. एतद्देशीय आर्यलोकांचे पूर्वज उत्तर हिंदुस्थानांत येऊन राहण्या पूर्वींच त्यांच्या मध्यें ब्राह्मण लो-

कांस धर्म प्रकरणांत श्रेष्ठत्व मिळालें होतें व त्यांची अगदीं स्वतंत्र अशी एक जात होऊन राहिली होती असें दिसतें. ही गोष्ट सहस्र वाटांनीं ख्रिस्ती शकाच्या पूर्वीं सुमारें १००० वर्षांमागेंच झाली असावी. त्याकाळाच्या सुमारास ब्राह्मणलोक उत्तर हिंदुस्थानांतील लहानसान राजेरजवाड्यांचे यज्ञ करण्यांस गुंतले होते असें दिसतें. ब्राह्मण लोकांनीं अनुष्ठित अशा यज्ञयागादि कर्मांपासून होणाऱ्या अद्भुत परिणामांवर व त्या कर्मांच्या अलौकिक शक्तींवर त्या काळच्या बहुतेक राजांचा पूर्ण भरवसा होता, असेंही दिसतें. संस्थानिक लोक व संपन्न लोक हे भोळे असल्यामुळें ब्राह्मणांस आनुकूल्य होऊन त्यांनीं त्यांजपासून यज्ञयागादि कर्म करण्या बद्दल आपणास अपरिमित देणग्या संपादल्या. या देणग्यांस **दक्षिणा** म्हणत असत, आणि तोच दक्षिणा शब्द आज पावेतों चालत आला आहे. एखाद्या राजास आपला शत्रु जिंकण्याची इच्छा झाली, अगर एखाद्यास सर्व पृथ्वि ( म्हणजे उत्तर हिंदुस्थान व मध्य हिंदुस्थान ) जिंकण्याची इच्छा झाली तर ब्राह्मण त्यास अश्वमेध यज्ञ करण्यास सांगत. या यज्ञास खर्च म्हणजे इतका लागे कीं, कांहीं थोडासा काळ पावेतों, त्या यज्ञ करणाऱ्या राजाचा खजीना अगदीं निर्द्रव्य होत असे. तो यज्ञ होऊन तो राजा असपासच्या संस्थानां बरोबर युद्धप्रसंग करून परत आल्या नंतर, ब्राह्मण लोक त्यास, तूं सार्वभौम हो अशा रीतीनें आशीर्वाद करून पुढें विश्वजित् ( सर्व विश्व जिंकण्याचा ) यज्ञ करण्यास सांगत. या यज्ञाचाच एक

भाग असा असे कीं, यज्ञ करणाऱ्या राजानें आपलें सर्वस्व म्हणजे कांहीं एक वर्षांच्या अवधींत त्यानें जें कांहीं संपादलें असेल तें सर्व, ब्राह्मणास देऊन टाकावें.

एखाद्या राजास स्वर्गास जाण्याची अथवा इंद्रपद मिळवण्याची इच्छा झाली तर, ब्राह्मण लोक त्यास असें सांगत कीं, हें घडवण्याचें आमच्या हातीं आहे. या कामा करितां ते त्यास दुसराच एक क्रतु किंवा क्रतूंची माला करावयास आज्ञा करीत. अशा प्रकारच्या क्रतूंत सोमरसाच्या पानाचें फल मोठें आहे; तरी ते, या प्रसंगींही ( ही गोष्ट मोठी चमत्कारिक आहे कीं ) त्या राजांस तो रस पिऊंदेत नसत. ते सांगत कीं, पवित्र सोमरसाचें पान करणें, हे केवळ ब्राह्मणासच विहित आहे आणि तो जर आतां तुम्ही प्याल तर, पुढें तुम्हास दुःख होईल, आणि तुमचें क्षात्र अथवा तुमची सार्वभौम शक्ति नष्ट होईल, म्हणजे सार्वभौम शक्तीशीं तुमचा जो कांहीं गुप्त संबंध आहे तो नष्ट होईल. सोमरसाबद्दल ते त्यांस अनेक वृक्षांच्या शाखांपासून तयार केलेला मादकरस पिण्यास सांगत. तो रस खरोखर सोमरसच आहे अशा भावनेनें त्यांस पिण्यास आज्ञा करीत, आणि पुढें ज्याचा तर्जुमा लिहिला आहे तो मंत्र त्यांजकडून पानाच्या काळीं म्हणवीत:—

"उत्तम रीतीनें तयार केलेल्या ज्या ( सोम ) रसाचें पान ( देवांचा स्वामी ) इंद्र यानें केलें त्याचें ( सोमरसाचेंच ) त्याच्या ( सोमरसाच्या ) ठायीं भक्ति ठेवून मी करतो."

सोमरसाच्या पानापासून जो परिणाम होतो असें मानलेलें

आहे त्या विषयीं कांहीं थोडेंसें येथें लिहितों. **सोम** या नांवाचा एक वृक्ष आहे. अनेक प्रकारचे संस्कार करून याचा रस काढतात. हा वृक्ष सर्व वृक्षांचा राजा मानला आहे, आणि वेदांतील कथां प्रमाणें पाहतां, हा देवांचाही राजा आहे. स्वर्ग लोकांमध्यें **सोम** म्हणजे चंद्र होय आणि भूलोकामध्यें **सोम** हा वृक्ष होय. या वृक्षाचा रस म्हणजे त्या स्वर्गस्थ सोमाचें रक्तच होय. सोमपान करणाऱ्याचा स्वर्गलोकांतील राजाशीं गुप्तरीतीनें संबंध करण्याचें व त्यास स्वर्गांत जागा मिळवून देण्याचें सामर्थ्य या रक्ताच्या अंगीं आहे. हा उत्तम रस प्राप्त होण्याकरितां या झाडाच्या शाखा धोंड्यांनीं ठेंचून पिळल्या पाहिजेत. या कृतीपासून सोम राजाचा वध होतो असें मानित आहे आणि या वधापासून घडणाऱ्या पातकाच्या निष्कृतीसाठीं चालू यज्ञामध्यें कांहीं प्रायश्चित्तें करावीं लागतात. ब्राह्मणांचें ह्मणणें असें आहे कीं, देवांपासून मनुष्यांस समजण्याच्या ज्या गोष्टी त्यांस, ज्या पुरुषानें सोमरसाचें पान केलें असेल, तोच एक पात्र होय. कारण तो पुरुष या जगांत असतांच देवांशीं गुप्तरीतीनें संबंध पावलेला असतो, तेव्हां तात्विक दृष्ट्या पाहतां तो देवच असतो. सोमरसाच्या पानाच्या अंगीं एवढी मोठी अलौकिक शक्ति मानली असल्यामुळेंच ( स्वर्गवासी व विश्वपालक अशा देवांबरोबर भाषणादि घडण्यास बलवत्तर साधन अशा ) सोमरसाच्या पानाचा अधिकार ब्राह्मणांनीं केवळ आपणांकडे ठेविला आणि क्षत्रिय व कमी जातीचे वर्ण यांस त्या अधिकारांतून अ

गर्दी वगळलें. ब्राह्मण, यजमानाचें यज्ञकर्म आणि क्षत्रिय व वैश्य या यजमानांचें यज्ञ कर्म यांत, सर्व संस्कारां मध्यें प्रमुख जो यजमानास सोमपानाचा संस्कार तो एक क्षत्रिय व वैश्य यजमानांस खेरीज करून बाकीचे सर्व संस्कार अगदीं एक सारखेच करीत असत.

राजाच्या घरच्या उपाध्यायाचा अधिकार मिळण्या विषयीं ब्राह्मण लोक फार झटत. या उपाध्यायास पुरोहित ( देखरेख करणारा ) म्हणत असत. याचें काम राजाबद्दल दररोज होम करावा, आणि ऐहिक व आमुष्मिक कृत्यांत त्यास साह्य करावें. उपाध्यायाचा अधिकार हा देवांनींच स्थापलेला असें मानित आहे. कारण सर्व देवांच्या घरीं अग्नि हा पुरोहित म्हणजे उपाध्याय होता. तेव्हां अजरामर अशा देवांस जर उपाध्यायाची गरज लागते तर या मृत्युलोकांत राहणाऱ्या राजांस ती विशेषतः लागेलच हें काय सांगावें. राजे लोकांस ब्राह्मणलोक वारंवार सांगत असत कीं जर देवांस तुह्मी स्वतःच हविर्भाग द्याल तर ते तो कधीं घेणार नाहींत. जेव्हां एखादा योग्य ब्राह्मण पुरोहिताच्या अधिकारावर नवीनच नेमण्याचा असे तेव्हां राजास आपल्या मानभंगाच्या ही किती एक गोष्टी कराव्या लागत. त्याला स्वतः त्या ब्राह्मणाचे पाय धुवावे लागत. ते धुण्याच्या वेळेस म्हणावयाच्या मंत्राचा अर्थः– "हे देव हो, माझ्या राज्याचें संरक्षण होण्या करितां, व तें निर्भय राहण्या करितां, ( या पुरोहिताचा ) उजवा व डावा पाय मी धुतों. ज्या उदकांनीं ( या पुरोहिता-

चे ) पाय धुतले आहेत, तींहीं माझ्या शत्रूंचा संहार करोत. या नवीन पुरोहितास राजानें आपल्या सर्व ऐश्वर्याचीही ज शी काय अधिदेवताच असें मानावें असें होतें. ब्राह्मणां त्या राजास असें सांगणें असे कीं, हल्लीं व पुढें तुझ्या सर्व ज्याची जी समृद्धि होणें आहे ती या पुरोहिताच्याच हातांत आहे

या सर्व गोष्टींवरून, राजे व त्यांच्या प्रजा या सर्वांस ध र्माच्या बळकट प्रतिबंधांत ठेवून त्यांजवर आपला वर्चस्मा रा खण्याचा जो ब्राह्मणांचा हेतु तो सहजच कोणाच्याही ध्यानां त येतो. हे ब्राह्मण लोक अशा रीतीच्या खटपटी सतत करीत असतां त्यांस कोणत्याही राजेलोकांकडून कधींच उ लट खटपट होणार नाहीं असें प्रायः घडणें कठीणच. वे दांमध्यें व महाभारतामध्यें राजांनीं ब्राह्मणांचें वर्चस्व नाकबूल केल्याचीं व त्यांच्या आज्ञेविरुद्ध वर्तणूक केल्याचीं अनेक उ दाहरणें लिहिलीं आहेत. पुष्कळ राजांनीं ब्राह्मणां वांचून यज्ञकर्मेंही केलीं व ब्राह्मणांचें मानखंडन देखील केलें. म हाभारताच्या पांचव्या पर्वांत अशी कथा आहे कीं, नहुष रा जानें ब्रह्मर्षींस आपली पालखी वाहावयास लाविलें. एका प्रसंगीं वेदांतील कांहीं संस्कारांचें व मंत्राचें पावित्र्य व प्रामा ण्य नहुष राजा नाकबूल करूं लागला, तेव्हां अगस्त्य ऋषि त्यास म्हणाला, " ज्या अर्थीं, प्राचीन काळच्या महा साधूंनीं स्थापित व ब्रह्मर्षींनीं अनुष्ठित असा पवित्र विधि तूं अपवित्र मानतोस, ज्या अर्थीं माझ्या मस्तकाला तूं पाय लावतोस, आ णि ज्या अर्थीं केवळ ब्रह्मस्वरूप व अजेय अशा ऋषींस तूं मू

र्पणानें आपले हमाल करून त्यांजकडून आपणास वाहविव-
तोस त्या अर्थीं हे दुष्टा पातक्या, तुझ्या सर्व तेजाचा नाश हो-
ऊन व तुझ्या सर्व सुकृताचा क्षय होऊन तूं स्वर्लोकापासून
भूलोकावर पतन पाव. या पुढें तूं मोटा भुजंग होऊन दाहा
हजार वर्षें पर्यंत पृथ्वीवर संचार करशील आणि ही मुदत
सरली म्हणजे तूं पुनः स्वर्गारोहण करशील. या प्रमाणें त्या
दुष्ट राजास शापदेऊन स्वर्ग लोकांतून इंद्र पदावरून खा-
लीं लोटून दिलें.

एखाद्या राजानें ब्राह्मणांचा उपदेश अमान्य केला अथवा
त्यांचा अधिकार मोडला तर, ते पुढच्या राजांनीं आपल्या अ-
धिकारास विशेष वश होऊन चालावें ह्मणून त्या अधिकार
मोडणाऱ्या राजाच्या नाशाविषयीं (खऱ्या अथवा कल्पित) गो-
ष्टी चोहोंकडे प्रसिद्ध करीत असत.

ब्राह्मण्याचा अधिकार आपणास मिळवावा असाही कांहीं
राजांचा फार कटाक्ष होता; परंतु त्यांस तो देण्यास ब्राह्मण-
नेहेमी मोठे नाखुष असत. क्षत्रिय जातीचा राजा भूदेवाच्या
ह्मणजे ब्राह्मणांच्या बंधुवर्गांत आल्याचें उदाहरण एकच आ
ढळतें. तोराजा विश्वामित्र होय. वेदांत त्याच्या नांवाचीं जीं*
सूक्तें आहेत त्यां वरून तो, पंजावांतील "बिहात" व "सतलज"
या दोन नद्यांच्या मधल्या लहानशा प्रांताचा राजा होता अ-
सें दिसतें. तो मोटा प्रख्यात कवि होता. यज्ञांमध्यें अनेक प्र-
संगीं त्यानें आर्त्विज्य केलें. सुदास ह्मणून त्या काळीं एक मो-

*वेदामध्यें त्याच्या रचनेचीं सुंदर सूक्तें बहुत आहेत—स. हि.

ठा बलाढ्य राजा होता त्याच्या घरचें पौरोहित्यही त्यानें पादलें होतें. परंतु, पुढें वसिष्ठानें सुदासाच्या मनामध्यें, विश्वामित्र हा क्षत्रिय असल्यामुळें यास पौरोहित्य करण्याचा अधिकार नाहीं, असें भरवून देऊन त्यास त्या अधिकारावरून काढून टाकलेंसें दिसतें. पुढें विश्वामित्र हा माझा अधिकार अगदीं ब्राह्मणाच्या बरोबरीचा आहे असें प्रतिपादन करूं लागल्या वरून, त्याच्या व वसिष्ठाच्या कुटुंबांच्या मध्यें मोठें हाडवैर पडलें. विश्वामित्राचें प्रतिपादन बहुत काळ पावेतों मान्य झालें नाहीं. तथापि कविताशक्ति, यज्ञकर्मामध्यें पाटव आणि वेदांतामध्यें नैपुण्य इतक्या गोष्टींमध्यें प्रख्यात असे जे त्या काळचे वसिष्ठादिक मोठमोठे विद्वान ब्रह्मर्षी होते त्यांस तो केवळ समकक्ष होता त्यामुळें शास्त्रा प्रमाणें तूं आमच्या वर्णांतला आहेस असें ह्मणणें व त्याच्या वंशास ब्राह्मण वर्णाचे सर्व अधिकार लागू करणें या दोनगोष्टी सर्व ब्राह्मणांस भाग पडल्या, दुसरा उपायच राहिला नाहीं.

वेदाच्या सूक्तांत आणि ज्यांत विश्वामित्राची गोष्ट केवळ पौराणिक रीतीनें लिहिली आहे अशा रामायणांत, कायत्या या थोड्याशा गोष्टी इतिहासा दाखल सांपडतात. प्रस्तुत काळीं विश्वामित्र गोत्राचीं, ह्मणजे ज्याचा मूळ पुरुष विश्वामित्र होता अशीं घराणीं ब्राह्मण जातींत बहुत आढळतात.

आतां ऋषींविषयीं कांहीं थोडेसें सांगून हा विषय समाप्त करतों. ऋषि याचा मूळ अर्थ द्रष्टा (पाहणारा); आणि हा शब्द प्राचीन काळच्या ज्या साधु पुरुषांस वेदाचीं सूक्तें देवांपा-

सून उपदेश रूपानें मिळालीं असें ह्मणतात त्यांसच लावीत, असत, या उपदेशरूपानें मिळण्यास पारिभाषिक शब्द "दृश्" (पाहणें) हा होय. कारण, लोक असें मानीत असत कीं, मंत्र हे ऋषींनीं आपल्या ज्ञानचक्षूंनीं (प्रायःसोमरसाच्या पानानें एकतान वृत्ति झाली ह्मणजे तींत असतां) पाहिले; त्या नंतर ते त्यांनीं आपल्या शिष्य वर्गास पढविले. या प्रमाणें पुढल्या लोकांत ते अनुवृत्तीनें चालत आले. ऋषि हे अनेक जातीचे होते; कांहीं राजर्षि (राजे असून साधु) होते, हे क्षत्रिय जातीचे होते; कांहीं ब्रह्मर्षि (ब्राह्मण असून साधु) होते, हे ब्रह्मज्ञ होते; कधींकधीं ऋषींच्या मंडळांमध्यें शूद्रही आढळतात. ऋषींच्या घराण्या पैकीं जीं मोठीं वजनदार व ज्यांत मुख्यत्वें करून यज्ञकर्म संबंधी पाढव, वेद व वेदांताचें तत्वज्ञान या गोष्टी बहुत प्राचीन काळा पासून परंपरया प्राप्त होत आल्या होत्या, त्या घराण्यांनीं आपला एक **ब्राह्मण** नांवाचा वर्ण बनवला. या सर्व घराण्यांचे मूलपुरुष विश्वामित्र, वासिठ, गौतम, अत्रि इत्यादि मिळून एकंदर सात आहेत. ब्राह्मणांच्या प्रत्येक कुळाला आपण कोणत्या मूल पुरुषापासून उत्पन्न झालों ही माहिती असली पाहिजे; आणि हिंदुस्थानाच्या या भागांतल्या ब्राह्मणांस त्या प्रमाणें ती खरोखर आहे. कोणतंही श्रौत अथवा स्मार्त कर्म करण्याच्या वेळेस ब्राह्मणांस आपल्या गोत्राचा व प्रवराचा, ह्मणजे आपल्या कुलाच्या मूलपुरुषांचा उच्चार करावा लागत असतो. या गोत्रांचा व प्रवरांचा घोटाळा न व्हावा ह्मणून ऋषींच्या कुलांचा व त्यां·

च्या अर्वाचीन काळीं विद्यमान अशा शाखांच्या वंशांच्या
ठमोठ्या यादी करून ठेवल्या आहेत. आजदिवस पावेतों ब्राह्
ण वर्णाच्या इमारतीस या यादी हा एक मोठाच बळकट आ
धार झालेला आहे.

---

समाप्त.

# वेदांवर दुसरें व्याख्यान.

प्रथम व्याख्यानांत वेदांच्या साधारण स्वरूपाविषयीं कांहीं माहिती सांगितली आहे. आतां या द्वितीयव्याख्यानांत वेदांतील देवविषयक विचार व तत्वविचार यांविषयीं सरासरी संक्षेपानें कांहीं थोडेंसें लिहितों.

वेदांच्या प्राचीन भागांचा ह्मणजे संहिता व ब्राह्मण यांचा व्यासंग व विचार करणाऱ्यांस* दोन गोष्टींचें मोठें आश्चर्य होतें.—वेदांत बहुत देवांच्या प्रार्थना केल्या आहेत ही एक, आणि ते देव हिंदुलोक हल्लीं ज्यांची पूजा अर्चा करतात त्यांहून अगदीं निराळे आहेत ही दुसरी. या गोष्टीवरून असा एक मोठा विचार उत्पन्न होतो, कीं हे सर्व देव स्वतंत्र आणि अनादि कालापासून असणारे असे मानले आहेत अथवा ते उत्पन्न केलेले असून दुसऱ्या एखाद्या मुख्य देवाचे अंकित असे मानले आहेत.?

या सर्वांस सामान्यतः लावलेला जो **देव** शब्द त्याचा अर्थ काय आहे याचाच प्रथमतः विचार करूं. अवयवार्थ पाहतां हा प्रकाशणें या अर्थाच्या **दिव्** धातूपासून झालाआहे; यामुळें याचा अर्थ प्रकाशणारा, आकाशस्थ असा आहे. ऋग्वेदसंहितेंत विशेषणरूपानें हा शब्द, बहुतेक देवांस लावलेला वारंवार आढळतो.—**अग्नि**— (यज्ञस्यदेवमृत्विजं) **सविता**

*युरोपियन लोकांस. स.

(चालक, उत्पादक ) ह्मणजे सूर्य, **अश्विन** ह्मणजे अश्विनी कुमार, **उषस्** ह्मणजे प्रातःकाळ, **अदिति** ह्मणजे देवमाता **वाक्** ह्मणजे वाचा, **त्वष्टा** ह्मणजे देवांचा सुतार, या सर्वांस लावला आहे. कितीएक यज्ञीय ऋचांत व वाक्यरूप मंत्रां देव हें अचेतन वस्तूंचें विशेषण केलें आहे. उदाहरण, यज्ञां प्रधान देवतांस अवदानें देण्याच्या पूर्वीं ह्मणावयाचे "प्रयाज आणि मागून ह्मणावयाचे "अनुयाज" यांमध्यें **बर्हि** ह्मण: यज्ञासन व **द्वारें** ह्मणजे दारें यांस **देव** ह्मणजे दैवीय असें ह्मटलें आहे. पृथ्वीस देवी, ह्मणजे आकाशस्थ असें ह्मटलें आहे. आणि विशेषतः उदकांस देवी असें ह्मटलें आहे. ( आपो देवीः) **अध्वर** ह्मणजे यज्ञ, **धी** ह्मणजे बुद्धि, **सुष्टुति** ह्मणजे कांहीं सूक्तांचें पठन, **मन** ह्मणजे मनुष्याचा आत्मा यांसही देव ह्मणजे दैवीय असें ह्मटलें आहे.

याअर्थीं देव शब्द, होमर *याच्या ग्रंथांत **दीअस** (दैवीय) शब्द आहे त्याच्याच अर्थाचा आहे. या ग्रंथांत कितीएक घोड्यांसच दीअस ह्मटलें आहे असें नाहीं, तर पिण्याचे पदार्थ वगैरे अशा अचेतनासही ह्मटलें आहे.

वेदामध्यें नामरूपानें देव शब्दाचा प्रयोग असला ह्मणजे त्याचा अर्थ मनुष्यांहून श्रेष्ठ अशा प्राण्यांचा एक गण आहे; त्यांतला प्राणी असा असतो ह्मणजे त्याचा अर्थ कांहींसा, इंग्रजींतला "एंजल" शब्द अथवा पारसींतला "इजेद" (यजत) शब्द याच्या अर्थासारखा असतो. देव, ऋषि आणि पित-

* या नांवाचा पुरातन काळीं युरोपखंडांत प्रख्यात कवि होता. स.

र हे बहुधा एकत्र सांगितले असतात. या सर्व वरिष्ठ प्रतीच्या प्राण्यांचे निरनिराळे गण आहेत. देव व एंजल आणि ऋषि व सेंत हे बरोबरीचे होत. पितर हे मृत मनुष्यांचे आत्मे होत. देव व असुर हे हमेश एकत्रच लिहिले असतात. असुर हेही वरिष्ठ प्रतीच्या प्राण्यांच्या गणापैकींच आहेत. पण त्यांचें व देवांचें सतत वैर आहे. ते देवांशीं वारंवार युद्धप्रसंग करतात. त्यांनीं देवांचा अनेक वेळां पराभव केल्याचें प्रत्यक्ष वेदांतच आढळतें. यावरून हें सिद्ध होतेंकीं, ब्राह्मणांचे मूलपुरुष प्राचीन ऋषि हे देवांस "कर्तुं, अकर्तुं, अन्यथा कर्तुं समर्थ" अशी शक्ति आहे असें मानीत नव्हते. देव व असुर या दोन्ही पक्षांचे गुरु ब्राह्मणच होते असें महाभारतांत आहे. देवांचा गुरु बृहस्पति आणि असुरांचा शुक्र हे दोघेही खस्थ ग्रहमंडलांत प्रकाशत असतात. असुर हे (अहुर या नावानें) पारसीलोकांत हल्लीं पुजले जातात. पारसी असुरमतानुयायी आणि ब्राह्मण देवानुयायी, असें पारसी धर्माच्या मूळावर माझें व्याख्यान छापलें आहे त्यांत प्रतिपादन केलें आहे, आणि पारसीधर्म, त्यांचे ग्रंथ व त्यांची पवित्र भाषा यांवर मी लिहिलेल्या निबंधांत त्या गोष्टीचा विस्तार केला आहे. वेदांत जसे असुर (अहुर) हे मनुष्यांहून वरिष्ठ प्राणी धरले आहेत. तसेच जेंदावेस्तांत देव हे धरले आहेत आणि हे मायिक ज्ञानानें व शक्तीनें, असुर धर्मानें चालणाऱ्या पारसी लोकांच्या पूर्वजांस जेवढा उपद्रव होईल तेवढा करीत असत असें लिहिलें आहे. देव व असुर यांच्या मध्यें जीं सतत युद्धें होत

असत असें वेदांत आहे, तीं अत्यंत पुरातन काळीं ब्राह्म व पारसी यांच्या पूर्वजांच्या मध्यें धर्माच्या कारणानें जीं यु होत असत तींच होत यांत संशय नाहीं. देवमतानुयायी लो क मुख्यत्वें ब्राह्मणच होते, तरी त्यांचे प्रतिपक्षी असुर यांचा ही गुरु ब्राह्मणच होता, ही एक या प्रकरणाच्या कथाभागां त चमत्कारिक गोष्ट आहे. देवांस गुरु आहे असें या कथें आहे, यावरून देव सर्वज्ञ व सर्वशक्त असे मानलेले नव्हते हें सिद्ध होतें.

यज्ञांत ब्रह्मा नांवाचा ऋत्विज, बृहस्पतीचा अथवा चंद्राचा प्रतिनिधि, होता अग्नीचा, अध्वर्यु आदित्याचा ( कारण जसा आदित्य सर्वकर्में चालवणारा तसाच अध्वर्युही होय ) आणि उद्गाता पर्जन्याचा याप्रमाणें असतात.

देव एकंदर तेहतीस आहेत; त्यांत निरनिराळे गण आहे त. ऐतरेय ब्राह्मण ( २, १८ ) यांत हे पुढें लिहिल्याप्रमाणें आहेतः— ८ वसु, ११ रुद्र, १२ आदित्य, १ प्रजापति आणि १ वषट्कार ([1]वौषट् शब्द), अवदान[2] देण्याचा मंत्र संपला कीं आहुति अग्नींत टाकण्याच्या ऐन वेळेस ह्मणण्याचा हा शब्द आहे.

---

[1] पाणिनि ( ८, २, ९१ सू. ) याच्या मतीं हा एक शब्द आहे. त्याच्या प्रथमाक्षराचा उच्चार प्लुत ( त्रिमात्र ) ह्मणजे लांबट करावा. याचें मूलस्वरूप वौषट् असें प्लुत रहित आहे. वाहून नेणें या अर्थाच्या वह धातूचें प्रार्थनार्थी हें प्राचीन रूप आहे. एकंदरीनें याचा अर्थ— ( अग्नीनें ) हविर्भाग देवांस न्यावा.

[2] श्रौतकर्मामध्यें. स्व.

तेहतीस देवांचा दुसऱ्या रितीचा विभाग ऋग्वेद संहिते-वी एक फार प्राचीन ऋचा, ( १, १३९, ११ ) *येदेवासो दिव्येकादशस्थ पृथिव्या मध्येकादशस्थ ॥ अप्सुक्षितोमहिनैकादशस्थ ते देवासोयज्ञमिमंजुषध्वं ॥ अशी आहे तींत केला आहे. अर्थ.– हे एकादश देवानो, जे तुह्मी स्वर्गांत आहां; हे एकादश देवानो, जे तुह्मी पृथ्वीवर आहां; हे एकादश देवानो जे तुह्मी जलांत आहां ते या यज्ञाचें ग्रहण करा.

देवांची संख्या सर्वत्र तेहतीसच आहे असें नाहीं. ऐतरेय ब्राह्मणांत तेहतीस देव "सोमप" ( सोमरस पिणारे ) आणि तेहतीस "असोमप" ( सोमरस न पिणारे ) असे सांगितले आहेत. त्यांपैकीं असोमप ११, प्रयाज ११, अनुयाज ११, व ११ उपयाज हे होत. यांत समिधा, बर्हि, यज्ञमंडपाचीं द्वारें इत्यादि देवता येतात. या देवता यज्ञपशूच्या मांसाच्या भागानेंच संतुष्ट होतात; त्यांस सोमाची क्षुधा नसते. यांतले कांहीं आज्यानेंच[२] संतुष्ट होतात. त्यामुळें त्यांस "आज्यप" ( आज्यपिणारे ) म्हणतात.

सोमप व असोमप मिळून सहासष्ट ह्मणजे तेहतिसांच्या दुप्पट देव झाले. आतां विश्वामित्राच्या एका सूक्तांत (३,९,९) अग्नीची पूजा करणारे देव ३,३३९ सांगितले आहेत. ऋग्वेदाची शांखायन ह्मणून शाखा आहे,( ही दक्षिणेंत नाहीं,

---

* पाणिनिसूत्र ( ८, २, ८८ ये यज्ञकर्मणि –प्लुतः ) या वरच्या पतंजलीच्या महाभाष्यावरून "ये३ यजामहे" या यज्ञीय वाक्यांत जे देव आहेत ते सर्व या ऋचेंतले आहेत. ते ये या बहुवचनांत सर्व नामानें येतात. ये याच्या अर्थास प्राधान्य आहे ह्मणून त्याचा उच्चार प्लुत ह्मणजे लांबट करतात.

२ अजा ह्मणजे शेळी, तिचें तूप तें आज्य. ग्र.

गुजराथेंत आहे.) तिच्या श्रौत सूत्रांत (८,२१) देव ३३ च सांगितले आहेत; पण ते फक्त **विश्वेदेव** नांवाच्या ग तले सांगितले आहेत. विश्वेदेव या शब्दाचा अर्थ स देव असा आहे खरा; परंतु बहुतेक ठिकाणीं **मरुत**, **अंगिरस, साध्य, आप्त्य** इत्यादि गणांहून विश्वेदेव नांवा देवांचा गण अगदीं निराळा दिसतो.

देवांतही मनुष्यां प्रमाणेंच जाति विभाग केला आहे त्यांत ब्राह्मण दोनच आहेत.– अग्नि हा देवांचा पुरोहित, बृहस्पति हा देवांचा गुरु; क्षत्रिय ह्मणजे राजे–इंद्र, वरुण, म, मृत्यु, सोम (चंद्र), पर्जन्य, रुद्र आणि ईशान (शिव वैश्य ह्मणजे कृषिकर्म करणारे–गणेश, (अष्ट) वसु. (द्वाद श) आदित्य, विश्वेदेव आणि मरुत्, पूषा (हा धनगर, यार्च लग्नाच्या वेळीं प्रार्थना आहे) हा शूद्र होय. (ऐतरेय ब्राह्म ण, १९. याजवरचें सायनाचार्यांचें भाष्य आणि शतपथ ब्रा ह्मण, १४,४,२, ३३ हीं पाहावीं.)

मागें जे तेहतीस व त्यांहून अधिक देव सांगितले त्यांची संख्या उपनिषदें रचलीं त्या काळीं एका देवावर आणून ठे विली आहे. शुक्ल यजुर्वेदाच्या (५,९) बृहदारण्यक उप निषदांत या विषयावर मोठा चमत्कारिक संवाद आहे. शाक ल्य ऋषीचा पुत्र विदग्ध हा याज्ञवल्क्यास विचारतो, "देव किं ती आहेत?" उत्तर, "वैश्वदेव शस्त्राच्या (सोमयज्ञांत सायंकाळ च्या हवनाच्या वेळची एक प्रार्थना आहे तिच्या) निविदांत (देवांच्या नांवांच्या व पदव्यांच्या यादींत) जितके सांगितले

आहेत तितके;" ह्मणजे ३३००. पुनः,

विदग्ध— ॐम् देव किती आहेत!

याज्ञवल्क्य—तेहतीस.

वि०—देव किती आहेत!

या०—साहा.

वि०—देव किती आहेत?

या०—तीन.

वि०—देव किती आहेत?

या०—दोन.

वि०—देव किती आहेत!

या०—दीड.

वि०—देव किती आहेत?

या०—एकच्च.

वि—ॐम्, हे तीन हजार तीनशें देव कोण आहेत!

या—तेहेतीस देवांमध्यें यासर्वांची शक्ति आहे.

वि—हे तेहतीस देव कोण आहेत?

या—८वसु, ११ रुद्र, १२ आदित्य, एक इंद्र आणि १ प्रजापति.
(ऐतरेय ब्राह्मणांतली याद मागें दिली आहे, तिंत इंद्राबद्दल वषट्कार आहे.)

वि—८ वसु कोणते आहेत?

या—अग्नि, पृथ्वी, वायु, हवा, सूर्य (आदित्य), आकाश, चंद्र, आणि नक्षत्रें. यांस वसु ह्मणण्याचें कारण सर्व द्रव्य (वसु) यांजमध्यें ठेवलें आहे.

वि—११ रुद्र कोणते आहेत?

या—ते १० प्राण आणि ११वा आत्मा हे होत. त्यांस रु (रडणारे गरजणारे) ह्मणण्याचें कारण सचेतन शरीराचा त्याग करतें वेळीं ते [1]रुदन करतात.

वि—१२ आदित्य कोणते आहेत?

या—हे आदित्य ह्मणजे वर्षाचे बारा महिने होत. त्यांस आदित्य ह्मणण्याचें कारण, सगळ्या विश्वाप्रत आपणा बरोबर (आददाना) घेऊन, [यांति] जातात.

वि—इंद्र कोण आहे, प्रजापति कोण आहे?

त्या—इंद्र ह्मणजे स्तनित आणि प्रजापति ह्मणजे यज्ञ.

वि—स्तनित ह्मणजे काय व यज्ञ ह्मणजे काय?

या—स्तनित ह्मणजे वीज आणि यज्ञ ह्मणजे पशु.

वि—(तूं सांगितलेले) सहादेव कोणते आहेत?

या—अग्नि, पृथ्वी, वायु, हवा, सूर्य, आणि आकाश.

वि—तीन देव कोणते?

या—(भूर्, भुवर्, आणि स्वर्,) हे तीन लोक. कारण या तीन लोकां मध्यें सर्व देव राहतात.

वि (तूं सांगितलेले) दोन देव कोणते?

या—अन्न व आयुष्य.

वि—दीड देव कोणता?

या—जो वाहतो तो (वायु)

---

[1] सदाचरणा पासून उत्पन्न होणाऱ्या फळांचा उपभोग संपल्या मुळें. शंकराचार्य.

वि—जो वाहतो तो एकच असतां त्यास अध्यर्ध ह्मणजे दीड असें कां ह्मणतात?

या—कारण हें सगळें विश्व त्याच्या मध्यें अधि[1] ह्मणजे वाढलें.

वि—एक देव तो कोणता?

या—तो **प्राण** होय. त्यद्[2] ह्मणजे, जो तो (उद्देश्य व विधेय यांच्या समुच्चयाचा वाचक) याशब्दांचें वाच्य जें ब्रह्म तें हेंच होय.

याप्रमाणें याठिकाणीं याज्ञवल्क्य नामक महर्षीनें सर्वांचें चरम कारणत्व ब्रह्माच्या ठिकाणीं सांगितलें आणि संहिता व ब्राह्मण यांजमध्यें बहुतेक स्थळीं **प्रजापति** हेंच मुख्य अधिष्ठान दिसतें. या नांवाचा अर्थ प्रजांचा (सर्व प्राण्यांचा) स्वामि असा आहे. यज्ञाचें त्याचें आणि वर्षाचें त्याचें तादात्म्य मानलेलें हमेषा आढळतें. ब्राह्मण नामक ग्रंथांत हा प्रजापति सगळ्या विश्वाचा व वेदांचा निर्माण कर्ता असा मानला आहे. पुराणांमध्यें जें ब्रह्मदेवाचें महत्व आहे तेंच प्रजापतीचें वेदाच्या विशेष प्राचीन भागांत आहे. हें ऐतरेय ब्राह्मणाचें वाक्य (५,३२) यावरून स्पष्ट समजतें. हें वाक्य फार महत्वाचें आहे. यास्तव याचा तरजुमा करून पुढें लिहिला आहे:—

---

१ सर्व सृष्टीचा चालक आत्मा हा एक धरिला आहे, आणि त्याच्या द्वारा जें सत्ता पावणारें तें अर्ध धरलें आहे, मिळूनदीड.

२ संबंधि सर्वनाम आणि दर्शक सर्वनाम (यत्—तत्) या दोहोंचा समुच्चय या शब्दांत आहे. हा शब्द मुख्यत्वें करून वेदाच्या संस्कृत भाषेमध्यें आढळतो आणि प्राचीन पारसी लोकांच्या एक प्रकारच्या आकृतीच्या खोदीव वगैरे लेखामध्यें आढळतो.

" जीव उत्पन्न करावे आणि आपलीं रूपें वाढवावीं, अशी इच्छा प्रजापतीस झाली; त्यावरून त्याणें आपल्या सर्व प्राणशक्तींचा समुच्चय[1] (अतिशयित उष्णतेच्या स्वरूपानें) केले आणि तसें करून त्यानें पृथ्वी, अंतरिक्ष व आकाश हे तीन लोक उत्पन्न केले. ते त्यानें (आपल्या मनःशक्तीनें) तापवले, त्यांजपासून तीन तेजोमय पदार्थ निर्माण झाले; पृथ्वीपासून अग्नि, अंतरिक्षापासून वायु आणि आकाशापासून आदित्य. त्यानें (ते तीन तेजोमय पदार्थ आपल्या मनःशक्तीनें) तापवले, त्यांपासून तीन वेद उत्पन्न झाले; अग्नीपासून ऋग्वेद, वायुपासून यजुर्वेद आणि आदित्यापासून सामवेद. त्यानें तीन वेद तापवले त्यांपासून तीन पवित्रशब्द उत्पन्न झाले; ऋग्वेदापासून भूर् यजुर्वेदा पासून भुवर् आणि सामवेदापासून स्वर्. त्यानें पुनः हे तीन पवित्र शब्द तापवले. त्यांपासून अ, उ, म हे ध्वनि निर्माण झाले. त्यांस एकत्र करून ॐम् हें अक्षर केलें. याकारितांच पुरोहित ॐम्, ॐम् असें ह्मणतात; कारण, (एक) ॐम् स्वर्लोक होय, आणि (दुसरा) ॐम् जो आपल्या किरणानीं तपतो तो [ आदित्य ] होय."

" प्रजापतीनें (ज्यास यज्ञमाला असें मानतात तो) यज्ञ आरंभला. तो आपणच (पावून) घेऊन त्यापासून यज्ञ केला. त्यांत यानें ऋग्वेदानें हौत्र केलें, यजुर्वेदानें अध्वर्यव केलें आणि

---

१ "तपः अतप्यत" याचें भाषांतर मी याप्रमणें करतों. तपशब्दाच्या आलीकडच्या अर्थाच्या धोरणानें सामान्यतः " त्यानें तपश्चर्या केली " असें भाषांतर करतात. आणि अक्षरशः भाषांतरानें "आपली उष्णता उष्ण केली ह्मणजे आपली उष्णता अतिशयित केली " असें होतें.

सामवेदानें उद्गातृत्व केलें. तीन वेदांचें जें सहजसिद्ध वैभव त्यापासून त्यानें ब्रह्मरूप तत्व निर्माण केलें."

येथें ब्रह्म प्रजापतीनें निर्माण केलें, असें म्हटलें आहे. तेव्हां तें अर्थात विश्वाच्या उत्पत्तीचें चरम कारण नव्हे. आणि उपनिषदांत ब्रह्माचें आणि पुराणांत विष्णूचें व शिवाचें जें महत्व आहे तेंच ब्राह्मणग्रंथांत सर्वत्र प्रजापतीचें आढळतें. देव हे प्रजापतीचे अवयव मानले आहेत, (अथर्वणवेद). ऐतरेय ब्राह्मण (५,२५) यांत गूढ अशा अर्थाच्या बारा नांवांनीं बारा प्रजापति गणले आहेत. ते असे, (अन्नाद देहः) ह्मणजे अन्न भक्षक, अन्नपत्नी (तनुः) ह्मणजे अन्नाची पत्नी इत्यादि. ह्या गूढार्थक बारा नांवांचे अर्थ ऐतरेय ब्राह्मण कर्त्यानें केले आहेत. ते हे, १ अग्नि, २ आदित्य, ३ सोम, ४ पशु, ५ वायु, ६ मृत्यु, ७ पृथ्वी, ८ आकाश, (फिरून) ९ अग्नि, व १० आदित्य, ११ मन आणि १२ संवत्सर. गूढार्थक नांवांपैकीं ज्याचा मन असा अर्थ केला आहे ते "अपूर्व" हें होय. याचा अर्थ, ज्यास पूर्व ह्मणजे पूर्वीं असणारें कारण नाहीं म्हणजे जें उत्पन्न केलेलें नाहीं असा आहे.

प्रजापतीचें एवढें महत्व असतां तें उत्तरोत्तर कमी झालें, याचें कारण हें असावें, कीं यज्ञ करण्याच्या योगानें, त्यांत विशेषेंकरून प्रजापतीनें स्वतः केलेला द्वादशाहनामक यज्ञ करण्याच्या योगानें, मनुष्यास प्रत्यक्ष प्रजापातित्व प्राप्त होऊं लागलें. याप्रमाणें अनेक प्रजापति, ह्मणजे सृष्टिकर्ते झाले, तेव्हां प्राचीन काळच्या हिंदुऋषींच्या मनास ती गोष्ट समाधानाची

वाटेना. प्रजापतित्व प्राप्त होण्यासाठीं यज्ञाचें उत्तम रितीनें सांग अनुष्ठान करणाऱ्या मनुष्यां खेरीज, एक स्वतंत्र अद्वितीय सर्वांचेंच चरम कारण व मुख्यतत्व कोणतें या शोधांत ते ( ऋषि ) होते. हें अशा रीतीचें कारण व तत्व त्यांस ब्रह्म-हें समजलें.

हिंदुलोकांच्या अध्यात्म विद्येंत ब्रह्मशब्द अत्यंत मुख्य व फार व्यापक आहे; याकरतां त्याच्या मूल अर्थाविषयीं कांहीं थोडेंसे लिहिणें योग्य आहे. हा शब्द फार प्राचीन व अत्यंत अर्वाचीन अशा सर्व वैदिक ग्रंथांत सांपडतो. त्याप्रमाणेंच अध्यात्मविद्येवर जेवढे संस्कृत व प्राकृत ग्रंथ झाले त्या सर्वांत हा आढळतो. याचा अर्थ सर्वत्र एकच असतो असें नाहीं याच्या अर्थाविषयीं वैय्याकरणांचीं मतें पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत. ब्रह्मचारि शब्द पुढें असतां व एक चरण ह्मणजे शाखा असा अर्थ विवक्षित असतां, समान शब्दास स आदेश होतो अशा अर्थाच्या एका पाणिनिसूत्रांत* (६,३,८६) ब्रह्मचारि शब्द आहे. त्या सूत्रावर कात्यायनाचीं वार्तिकें व पतंजलीचें भाष्य आहे.

---

* पाणिनि—चरणेब्रह्मचारिणि ॥ कात्यायन—अत्रचरणे किंनिपात्यते ॥ पतंजलि— ब्रह्मण्युपपदेसमानपूर्वेव्रतेकर्मणिचरेर्णिनिः ॥ का०—व्रतलोपश्च ॥ प०— ब्रह्मण्युपपदेसमानपूर्वेव्रतेकर्मणिचरेर्णिनिः प्रत्ययोव्रतलोपश्चनिपात्यते ॥ समानेब्रह्मणिव्रतचारीस ब्रह्मचारी ॥

अर्थः— सशब्दपूर्वक ब्रह्मचारी शब्द, ह्मणजे सब्रह्मचारी शब्द वेदाध्ययन करणाऱ्या अनेक ब्रह्मचाऱ्यांच्या शाखेचें

( मागील पृष्ठावरील टीप. )

ऐक्य दाखवतो. का० या ठिकाणीं चरणरूप अर्थ विवक्षित असतां कोणत्या कार्याचें निपातन आहे. प.— गमनार्थक **चर** धातूहून णिनिप्रत्यय होतो. त्याचें ह्मणजे **चारी** याचें कर्म ( ब्रह्मचारी ज्या व्रताचें आचरण करतो तें ) व्रत आहे. सामासिक सब्रह्मचारी शब्दांतलें पूर्वपद जो सब्रह्मशब्द त्यांतल्या ब्रह्मशब्दाची वाच्य शाखा आणि त्याच व्रताचें आचरण करणाऱ्या दुसऱ्या ब्रह्मचाऱ्यांची शाखा एकच असली तर त्या सर्व ब्रह्मचाऱ्यांस **सब्रह्मचारी** शब्द लागतो. का०—व्रत ( व्रतचारी असें असावें ) शब्दाचा लोपही होतो. प०— व्रत हें कर्म असलें तरच **चर** धातूहून णिनि प्रत्यय होऊन **चारी** होतें, तर त्या व्रत शब्दाचा लोपही होतो. सब्रह्मचारी शब्दांत एकत्वाचा संबंध पूर्वपद जें सब्रह्म त्यांतल्या ब्रह्म शब्दाकडे आहे. **सब्रह्मचारी** याचा विग्रह समाने ब्रह्मणिव्रतचारी ह्मणजे एकाच शाखेंत व्रताचरण करणारा असा आहे. (सब्रह्मचारी शब्दाचा अर्थ बरोबरीचा अथवा सोबतीचा ब्रह्मचारी, असा नव्हे. तर ब्रह्मचर्य नांवाच्या आश्रमांत एकाच शाखेचें अध्ययन करणारा दुसरा ब्रह्मचारी, असा आहे. ) त्यावरून सब्रह्मचारी शब्दाचा अर्थ काय हें समजतें. सब्रह्मचारी ह्मणजे ज्या ब्रह्मचाऱ्याचा दुसऱ्या ब्रह्मचाऱ्याशीं सह एकच चरण ह्मणजे शाखा ( वेदाध्ययनाचा संप्रदाय ) आहे तो.—

* यासर्वांचें तात्पर्य—सब्रह्मचारीशब्दांत एकत्वाचा अन्वय चारी अथवा व्रतचारी इकडे नाहीं. तर ब्रह्मशब्दार्थाकडे आहे. आणि ब्रह्मशब्दाचा जो अर्थ येथें चरण शब्दानें झाला आहे.

ह्मणजे वेदाच्या त्याच शाखेच्या अध्ययनाकरतां व्रताचें आचरण करतो तो. महाभाष्यावरील व्याख्याकार कैय्यट यानें ब्रह्मशब्दाचा अर्थ वेद असें लिहिलेंआहे, आणि यथाशास्त्र वेदाध्ययनापासून प्राप्त होणाऱ्या फलासाठीं आचरावयाचें जें व्रत त्या व्रतरूप अर्थाचाही तो शब्ददर्शक आहे असें सांगितलें आहे. या दोहोंपैकीं त्याचा वेद हा पहिला अर्थ खरा आहे; परंतु दुसरा अर्थ वास्तविक नाहीं. कांहींतरीं क्लिष्ट कल्पना काढून केवळ निर्वाह करण्याची वैय्याकरणांची ही शैली आहे. असें करण्याचें कारण सब्रह्मचारी शब्दांत व्रतशब्दाचा अर्थ धडधडीत आहे तेव्हां त्याचा उच्चार करून लोप सांगावा परंतु तें पाणिनीनें केलें नाहीं, ही त्याची न्यूनता कात्यायन व पतंजलि यांनीं उघड केली, तेव्हां ती न्यूनता नाहीं असें दाखवण्याकरतां कैय्यटानें सफाईनें आपलें बुद्धिकौशल दाखवलें आहे. कात्यायन व पतंजलि हे ब्रह्मशब्दाचा अर्थ वेद असें स्पष्ट लिहीत नाहींत खरं, तथापि त्यांच्या शब्दांपासून तो अर्थ निष्पन्न होतो. (कारण "समाने ब्रह्मणि" ह्मणजे एकाच ब्रह्यामध्यें असें ह्मटलें आहे, हें एकत्व वेदाच्या शाखांसच ह्मणजे त्यांच्या निरनिराळ्या संप्रदायासच लागू होतें.) आणि प्राचीन व्याख्या कर्त्यानें हाच अर्थ सांगितला आहे.

वेदांची हाल्लीं दिसते त्याप्रमाणें पूर्ण व्यवस्था होऊन ते ईश्वरदत्त आहेत, असें मत सर्वत्र स्थापित होऊन त्यांच्या व्यासंगावर लोक विशेष लक्ष्य देऊं लागले, त्याकाळींच ब्रह्मशब्दास वेद हा अर्थ खचीत दिलेला असावा आणि ही गोष्ट ख्रि-

स्ती शकाच्या अगोदर कांहीं शतकांच्या पुर्वी झाली असावी असें दिसतें. यावरून अर्थात वेदाच्याच लेखांतल्या ब्रह्मशब्दास हा अर्थ लागू पडत नाहीं. निघंट म्हणून वैदिक शब्द व त्यांचे अर्थ यांचा एक प्रसिद्ध कोश आहे, त्यांत ब्रह्मशब्द द्विवार आढळतो ( २, ७ ) एकदां "अन्न" या अर्थी आहे व दुसऱ्यानदा "संपत्ति" या अर्थी आहे. परंतु संहितेच्या ज्या ऋचांत हा आढळतो त्यांत दोहोंपैकीं एकही अर्थ मिळत नाहीं. सायनाचार्यास ही अडचण पडून त्यानें निरनिराळ्या प्रकारचे अर्थ केले. बहुतकरून **स्तोत्र** हा अर्थ फार ठिकाणीं केला. वेदांतलीं ब्रह्मशब्द घटित कांहीं वाक्यें येथें लिहितों.–( ऋ. ७,२२,९ ) "येचपूर्वेऋषयोयेचनूत्नाइंद्रब्रह्माणिजनयंतविप्राः" ॥ अर्थ–हे इंद्रा, प्राचीन व अर्वाचीन अशा ज्ञानी ऋषींनीं ब्रह्में उत्पन्न केलीं आहेत. सायनाचार्य या ठिकाणीं ब्रह्में ह्मणजे स्तोत्रें ह्मणतो. हा अर्थ केवळ संदर्भावरून अनुमानानें काढला आहे असें दिसतें. "उद्ब्रह्माण्यैरत" ( ७,२३,१ ) ह्मणजे ब्रह्में उंच करा. या सूक्तांत ब्रह्में ह्मणजे स्तोत्रें व अवदानें असें सायनाचार्य ह्मणतो. "ब्रह्मदेवदत्तंगायत" ( १,३७,४ ) ह्मणजे देवानीं दिलेलें ब्रह्मगा. या सूक्तांत सायनाचार्य निघंटांतल्या अर्थास अनुसरला आहे. त्याची व्याख्या–हविर्भागांचें स्तवन करा. युरोपखंडांतील संस्कृत विद्वान लोकही ब्रह्मशब्दाचा अर्थ "स्तोत्र" "प्रार्थना" असाच सामान्यतः मानतात; परंतु मला या अर्थाविषयीं मोठा संशय आहे. त्याचा अर्थ केवळ स्तोत्र यापेक्षां खचीत अधिक आहे.

मीं ब्रह्म केलें आहे असें एकाएका ऋषीचें ह्मणणें सूक्तांत वा रंवार आढळतें. तसेंच ऋषीस कधींकधीं "ब्रह्मकृत्" ब्रह्म करणारा असें ह्मटलेलें आढळतें, तेथें त्या सूक्तांत सांगितलेले अथवा एखादा यज्ञांतलें " पवित्र उपकरण " असा अर्थ असतो.

ब्रह्मशब्दार्थ केवळ स्तोत्र नव्हे; त्यापेक्षां फार व्यापक आहे याविषयीं सबल प्रमाणें तैत्तिरिय व ऐतरेय या दोन प्राचीन ब्राह्मणांत बहुत आहेत. तैत्तिरिय ब्राह्मणाच्या आरंभींच एक मंत्ररूप वाक्य आहे. अध्वर्यु व त्याचा हस्तक प्रतिप्रस्थाता, हे दोघे आपल्या हातांत **शुक्र** व **मंथी** हे दोन चमस ( सोमरस पिण्याचीं पात्रें ) धरतात आणि त्या दोहोंचा संयोग करतात, तेव्हां अध्वर्यु तें वाक्य ह्मणतो, ह्मणजे त्या दोन चमसांची प्रार्थना करतो. * तुह्मांस एकत्र धरल्याच्या योगानें तुह्मी, ब्रम्ह, क्षत्र, इष् ( अन्न, ) ऊर्जम् ( बल ), रै ( द्रव्य, ) पुष्टि, प्रजा (मुलें), आणि पशु हे उत्पन्न करा. मंत्राचें शब्दशः भाषांतर— "तुह्मी दोघे ( चमस ) ब्रह्म इ० एकत्र स्थापा, तें मजसाठीं चेतवा." याचा अर्थ तुह्मा दोघांस एकत्र धरल्याच्या योगानें तुह्मी दोघे ब्रह्म इ० निर्माण करा आणि दोन काष्ठें घांसल्यापासून अग्नि पडून तो जसा चेततो तसें तुह्मी तें ब्रह्मचेतवा. "ब्रह्माजिन्वति"

---

* ब्रह्म संधत्तंतन्मे जिन्वतं ॥ क्षत्रं संधत्तं तन्मे जिन्वतं ॥ इष ँ् संधत्तं तां. मजिन्वतं ॥ ऊर्जं ँ् संधत्तंतामे जिन्वतं ॥ रयिं ँ् संधत्तंतामे जिन्वतं ॥ पुष्टि ँ् संधत्तंतामे जिन्वतं ॥ प्रजा ँ् संधत्तंतामे जिन्वतं ॥ पशून्संधत्तं तान्मे जिन्वतं ॥

ह्मणजे ब्रह्मचेतवतो, ब्रह्म उद्भूत करतो, असे वाक्य संहितेंत देखील वारंवार आढळतें. उदाहरणार्थ, ऋ. सं. ७,१०४,६ पाहा. यावरून स्पष्ट दिसतें कीं ब्रह्म हें विजेप्रमाणें एक अनुद्भूत शक्ति आहे असें मानलेलें होतें. आणि कांहीं यज्ञ, संस्कार, विधि इ. करणें झालें ह्मणजे त्यास उद्भूत करावें लागत असे. उद्भूत करण्याची यंत्रसामग्री ह्मटली ह्मणजे यज्ञपात्रें, मंत्रांचें पठन हेंच घर्षण. आणि ब्रह्म हें त्यापासून प्रथम व मुख्य उत्पन्न होय. यावांचून समग्र यज्ञ विफल होतो. जो यज्ञ करावयाचा असेल त्याच्या आणि त्या यज्ञापासून इच्छिलेलीं जीं साम्राज्य, अन्न, शक्ति, प्रजा पशु इत्यादि फळें यांचा परस्परांशीं संबंध करणारें हें ब्रह्मच होय. यावरून ब्रह्म ह्मणजे अन्न नव्हे व संपत्तीही नव्हे, तर तीं प्राप्त होण्याचें साधन आहे. लोकांमध्यें ब्राह्मण लोकांची एवढी मोटी वजनदारी असण्याचें कारण हेंचकीं वर सांगितलेलें ब्रह्म त्यांजपाशीं, अतिशय प्राचीन काळापासून वंशपरंपरया आलेलेंच आहे असा लोकांत पक्का समज होता. ब्रह्म हें ऐहिक व आमुष्मिक या दोन्हीं सुखांची इच्छा तृप्त करण्याचें साधन खचीत आहे असा विश्वास पूर्ण असेल तोंपर्यंत तें ब्रह्म पूर्णपणें स्वाधीन असणाऱ्या लोकांचें प्राबल्य सहजच राहील. ब्रह्मणाचें माहात्म्य इतकें होतें, कीं जसें एखाद्या देवालयांत अथवा पवित्र जाग्यांत वाईटसाईट कृत्य करतां कामानये तसें ब्राह्मणाचें शरीर ह्मणजे परम पवित्र होय यास्तव त्यास जें वाईट तें कधीं करूंनये असें मानलेलें होतें.

क्षत्र हें ऐहिक आधिपत्याचें गुप्ततत्व. हें ब्रह्मापासून सर्वदा पृथक् दाखवलेलें असतें. ब्रह्म व क्षत्र हीं दोन्हीं ऐहिक व ओमुष्मिक अथवा स्वार्थिक व पारमार्थिक या गोष्टींप्रमाणेंच परस्पराशीं विरुद्ध आहेत. हीं दोन्हीं प्रजापतीनें यज्ञ केला त्यापासून उत्पन्न झालीं. ( ऐतरेयब्राह्मण ७,१९ ) तीं झाल्या-नंतर कांहीं यज्ञसंबंधी अन्न भक्षणारे आणि कांहीं तें न भक्ष-णारे असे दोन प्रकारचे प्राणी उत्पन्न केले. त्यापैकीं भक्षणारे ब्रह्माचे अनुयायी झाले आणि न भक्षणारे क्षत्राचे झाले. यांतले भक्षणारे हे ब्राह्मण आहेत आणि न भक्षणारे क्षत्रिय वैश्य व शूद्र आहेत.

ब्रह्म व क्षत्र हीं दोन्हीं आह्मी यज्ञ घेऊं आह्मी यज्ञ घेऊं असें ह्मणूं लागलीं होतीं तेव्हां यज्ञ त्यांजपासून पळाला. मग ब्रह्मानें मात्र त्यास मागून जाऊन गांठलें, क्षत्रानें गांठलें नाहीं. त्यामुळें यज्ञ करण्याचा मूळचा अधिकार ब्राह्मणासच आहे. क्षत्रिय व वैश्य यांनींही यज्ञ करावा, परंतु तो करण्याच्या आधीं त्यांच्या मध्यें ब्रह्मरूपशक्तीची स्थापना झाली पाहिजे. नाहीं तर तिजवांचून त्यांचा यज्ञ अगदीं विफळ होतो. पुढें यज्ञ संपतांच ब्रह्मरूपशक्ति त्यांजपासून काढून घेऊन पुनः मंत्रानें क्षत्रादि शक्तीचें स्थापन करावें असें होतें.

ब्रह्मशब्दाची अधिक माहिती आणखी एका गोष्टीवरून लागते. प्रत्येक यज्ञांत चार ऋत्विज लागतात, त्यांत मुख्य ब्रह्मा असतो. बाकीचे तीन होता, अध्वर्यु व उद्गाता हे होत. होता ऋग्वेदाचे मंत्र ह्मणणारा, अध्वर्यु देवांचें हवि तयार

करणारा, अग्नींत अवदानें घालणारा, आणि यजुर्वेदाचे मंत्र मुख्यत्वें पाकक्रियेसंबंधि आहेत ते ह्मणणारा, व उद्गाता हा सामवेदाचे मंत्र गाणारा, हे तीन असामी आपल्या हस्तकांसहवर्तमान सर्व कर्म करतात व त्यात्या कर्मास सांगितलेले मंत्र ह्मणतात. ब्रह्मा ह्मणून जो ऋत्विज असतो त्यास यज्ञांत हातानें कांहीं विशेष कृति करावी लागतनाहीं, फक्त देखरेख ठेवावी लागते आणि बाकीच्या ऋत्विजांच्या अनुष्ठानांत अथवा मंत्र ह्मणण्यांत जितक्या चुका पडतात तितकीं प्रायश्चित्तें त्यास घालावीं लागतात. ह्मणजे इतर ऋत्विज आपलीं कामें हातानें व वाणीनें करतात आणि ब्रह्मा आपलें काम मननें करतो. सर्व यज्ञामध्यें व्यापक जें ब्रह्म त्याचा हा ऋत्विज प्रतिनिधिच असतो. निदान ज्यास तीन वेद चांगले येतअसतील तो. च पुरुष ब्रह्मत्वास योग्यहोय. प्राचीन काळाच्या संप्रदायाप्रमाणें ब्रह्मत्व करण्यास सगळया हिंदुस्थानांत हल्लीं एक ही ब्राह्मण सांपडणें कठीण आहे असें वाटतें. ब्रह्मा ह्मणजे सर्व पवित्र ज्ञानाचा केवळ निधिच होता, यामुळें तो सर्व यज्ञामध्येंन्यूनाधिक न होऊं देणारा असा त्याचा रक्षक असे.

ब्रह्मशब्दाची व्युत्पत्ति पाहातां, उचलणें या अर्थाचा बृह् धातु अथवा वाढणें या अर्थाचा वृह्धातु यापासूनच तो आला असावा. याचे सजातीय शब्द एक **वृहत्** (मोठा,उंच) जेंदभाषेंत **वेरेजत्** ( उंच ); दुसरा **बर्हिस्** जेंदभाषेंत **बरेजिस** (**कुशनांवाच्यादर्भाचेंआसन**). **ब्रह्म** शब्दही जेंदभाषेंत बरेश्म असा आहे, परंतु त्याचा अर्थ निराळा आहे. त्याचींरूपें ब्र·

ह्य शब्दा प्रमाणेंच होतात. त्याचा अर्थ झाडांच्या फोकांचा एकत्र बांधलेला जुडगा. पारशी उपाध्याय होम नांवाचा यज्ञ करीत असतात, तेव्हां हा जुडगा ते सतत जवळ वाळगीत असतात. हा होम* यज्ञ आर्य लोकांच्या प्राचीन काळच्या **सोम**-

* एका मूल भाषे पासून झालेल्या अनेक भाषाभेदांतल्या एकाच शब्दांत श ष स आणि ह या चार वर्णांची अदला बदल झालेली अनेक ठिकाणीं आढळते. उदाहरणें:—

| संस्कृत | मराठी | गुजराथी | पारसी | ग्रीक | लातिन | इंग्लिश |
|---|---|---|---|---|---|---|
| असुर | असुर | .... | अहुर | .... | .... | .... |
| दश | दहा | .... | दह | देका | दिसं | देसि(c) |
| ब्रह्म | ब्रह्म | .... | बरेश्म | .... | .... | .... |
| षष् | सहा | .... | .... | हेक्स | सेक्स | सिक्स |
| सप्त | सात | हात | .... | हेप्त | सेप्त. | सेवन |
| सम | सम | .... | .... | होमि, | सेमि. | सेमि (c) |
| सार्ध | साडे | हाडा | .... | .... | .... | .... |
| सोम | सोम | .... | होम | .... | .... | .... |

* या शिवाय संस्कृत भाषेंत **श, ष, स,** आणि **ह** प्रमाणें ऐकूं येणारा विसर्ग यांची तसतसे वर्ण आले असतां नेहमी अदलाबदल होत असते. उदाहरणें:—

| | | | |
|---|---|---|---|
| रामश् चरति. | रामष् टीकते. | राम **स्** तिष्ठति. | रामः करोति. |
| दु **श्** चल. | दु **ष्** कर. | दु **स्** तर. | दुः ख. |

स्व. हि.

यज्ञाचेंच कांहीं अवशिष्ट स्वरूप आहे. हे झाडाचे फोक ह्मणजे दर्भाप्रमाणेंच होत. ब्राह्मणाच्या यज्ञामध्यें यजमानानें दर्भ धारण केलें पाहिजे. दर्भाचा एक जुडगा बांधलेला असतो त्यास वेद ह्मणतात. तो यजमानपत्नीनें जवळ बाळगला पाहिजे. यावरून ब्रह्म शब्दाचा अगदी मूळचा अर्थ, यज्ञामध्यें लागणारा जो दर्भाचा जुडगा तोच प्रायः असावा असें वाटतें. सृष्टीमध्यें जो प्राण व जीवृद्धी आहे त्यांचा आणि सगळ्या विश्वाच्या व्यापक आत्म्याचा हा जुडगा यज्ञामध्यें प्रतिनिधि ह्मणजे दर्शक चिन्ह होतें. उत्तरोत्तर ब्राह्मणाचीं यज्ञकर्में आफाट वाढत चाललीं तेव्हां "जुडगा" हा मूळचा अर्थ विसरला गेला आणि त्याचा प्राण इत्यादि लाक्षणिक अर्थ मात्र राहिला.

सर्व विश्वाचा व्यापक आत्मा हाच प्रायः ब्रह्म शब्दाचा प्रथम लाक्षणिक अर्थ होता असें उपनिषदांतील वाक्यांवरून समजतें. ब्रह्म असें प्राणास ह्मटलेलें वारंवार आढळतें. आणि तो प्राण एकच आहे तेव्हां त्या एका प्राणापासून सगळ्या विश्वाचा व्यापक जो प्राण तो समजावयाचा हें उघडच आहे. ही प्राणरूप शक्ति सर्वत्र अनुद्भूत असते. ती जागृत करणें व चेतवणें याचें साधन यज्ञ होय. देवांच्या व मनुष्यांच्या मध्यें साक्षात् संबंध उत्पन्न करणारें जें यज्ञरूप यंत्र तें चालू करण्यास योग्य पुरुष ऋत्विज हे होत. तेव्हां शरीराचें व आत्म्याचें कल्याण ज्या ज्ञानापासून होतें असा लोकांत पूर्ण विश्वास होता, तें ज्ञान त्या ऋत्विजांनीं दुसऱ्यास न देतां फक्त आपणापाशींच ठेवलें. यापासूनच ब्राह्मण लोकांची मोठी वजनदारी वाढली.

**ब्रह्म** व **ब्रह्मदेव** या दोहोंमध्यें फरक : **ब्रह्म** ह्मणजे सगळ्या विश्वाचें प्राणरूप व्यापक तत्व आणि **ब्रह्मदेव** ह्मणजे त्या तत्वाची काल्पनिक मूर्ति होय. ब्रह्मदेव ( हा मूळचा भावरूप अथवा तत्वरूप असल्यामुळें ) लोकांत विशेष पूज्यतेप्रत पावला नाहीं. तेव्हां लोकांनीं कांहीं दुसरे देव त्यांतही मुख्यत्वेंकरून **विष्णु** व **शिव** हे प्रसिद्ध करून, सगळ्या विश्वाचें आधिपत्य पूर्वी ब्रह्माकडे होतें तें त्यांजकडे सोंपवलें.

वेदांत सांगितलेले जेवढे देव तेवढे बहुतेक देवत्वेंकरून मानलेले मनुष्यच आहेत असें दिसतें. निदान प्राचीन काळचे ऋषि तरी त्यांस असें मानीत असत. ते जन्मले असें ह्मटलें आहे आणि त्यांच्या जन्माविषयीं वारंवार लिहिलें आहे. त्यांस देवांचीं स्थानें अनादिकालापासून नाहींत. कारण, वेदामध्यें, विशेषतः ब्राह्मणामध्यें, देवांनीं यज्ञ केला आणि त्याच्या योगानें ते स्वर्गास गेले असें साफ लिहिलेलें बहुत ठिकाणीं आढळतें. यावरूनच वेद झाले त्याकाळीं सर्वांचा असा विश्वास होता, कीं जो कोणी मनुष्य यज्ञाचें अनुष्ठान यथाशास्त्र करतो तो स्वर्गास जातो आणि देवांच्या मंडळींत राहतो.

समाप्त.